वर्ष : सतरावे
डिसेंबर २०२५
अंक : बारावा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ४८

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस'प्रकाशनाचे व्यासपीठ



सातारा येथील ९९ व्या
'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'च्या
अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल
'पानिपत'कार विश्वास पाटील
यांचे हार्दिक अभिनंदन !



















# इंद्रधनुषी साहित्य योजना

## सप्ततारांकित लेखकांची राजहंसी पुस्तके
## २५% सवलतीत

डिसेंबर २०२५ महिन्यातील सप्ततारांकित लेखक



गिरीश कुबेर



अरुण खोपकर



डॉ. जयंत नारळीकर



विजय तेंडुलकर



फादर दिब्रिटो



डॉ. नरेन्द्र दाभोलकर



मोहन आपटे

**योजनेचा कालावधी १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२५.**

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष सतरावे :
अंक बारावा
१५ डिसेंबर २०२५
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी विशेष
  *'पानिपत'कार विश्वास पाटील* यांची मुलाखत
  मुलाखतकार : प्रशांत दीक्षित / ९
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *सीता* - विद्या पोळ - जगताप / २३
  *ज्याचं त्याचं एव्हरेस्ट*
  - डॉ. ज्योत्स्ना पडळकर / २५
- असे जन्मले पुस्तक!
  *सावलीचे गाणे* - विद्या पोळ - जगताप / २७
- आठवणींचा पारिजात
  *जीवेत् शरदः शतम्*
  - श्रीराम रानडे / ३१
- क... कवितेचा - उमा व्यास / ३५
- उद्‌गार -
  *कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या!*
  - मंगेश वरवडे / ३७

  *नृत्यमय जग... नर्तनाचा धर्म...*
  - रंजना फडके / ३९
- राजहंसी पार / ४३
- वाचकांच्या मनातलं... / ४५

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

# वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके



हिंदुत्वाची दोन मूलभूत वैशिष्ट्यं म्हणजे
आध्यात्मिक जीवनदृष्टी आणि त्यातून घडणारी
संयमित उपभोगाची जीवनशैली.
तसं जगणं म्हणजेच खऱ्या अर्थाने ‘धर्मपालन’!
निसर्गरक्षणासाठी उपयोगी ठरणाऱ्या मूळ
हिंदुत्वाची युगानुकूल मांडणी करणारं
आणि त्याच्या आचरणाचा आग्रह धरणारं
हे पुस्तक -

## हरित हिंदुत्व

दिलीप कुलकर्णी

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)



“मराठी रंगभूमीला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर
नेण्यासाठी प्रत्येक मराठी माणसाचं कर्तव्य म्हणजे
‘भूमिका’ पाहणं!”

- *अभिनेता, अतुल कुलकर्णी*

“वरवर सुखवस्तू, स्थिर आणि सुरक्षित भासणाऱ्या
मध्यमवर्गीयांना भूकंपसदृश धक्का देऊन सामूहिक
आत्मपरीक्षण करायला लावणारं नाटक
म्हणजे ‘भूमिका’!

- *संपादक व माजी राज्यसभा सदस्य, कुमार केतकर*

## भूमिका

क्षितिज पटवर्धन

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

## संपादकीय

रंग उगवतीचे... चैतन्याचे!

*प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील फुलपाखरासारखा स्वच्छंद काळ म्हणजे बालपण. या वयात त्याचं भावविश्व आकारत असतं. व्यक्त होण्याला स्वतंत्र धुमारे फुटण्याची हळूहळू सुरुवात झालेली असते. मन टीपकागदाप्रमाणं भवताल टिपत असतं. नवनव्या गोष्टी उत्सुकतेनं ग्रहण करत साठवत असतं. हेमंत ऋतूत आपलं शरीर जसं ऊर्जा साठवतं अगदी तसंच! सुपीक जमिनीत पावसाचं पाणी सहज मुरावं तसं बालमनात अनेक गोष्टी मुरत जातात. भविष्यात त्यातूनच उमलून येण्याच्या, कलानिर्माणाच्या शक्यता असतात.*

वाचकहो नमस्कार.

आज तुमच्याशी एका आत्मीय विषयावर बोलणार आहे. तो विषय म्हणजे 'बालसाहित्य'. नुकताच १४ नोव्हेंबरला आपण बालदिन साजरा केला. आता डिसेंबर - जानेवारी महिन्यात ठिकठिकाणी होणाऱ्या विविध साहित्यसंमेलनांमधून, पुस्तक महोत्सवांतून बालकांसाठीही स्वतंत्र दालनं सजतील,त्यांच्यासाठीही खास कार्यक्रमांचं आयोजन केलं जाईल. बालकुमार साहित्य संमेलन होईल.थोडक्यात काय तर आजच्या काळात मोठ्यांइतकंच लहानांच्याही भावविश्वाचं महत्त्व सर्वांना वाटतं आहे. देशभर राबविण्यात येत असलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आता प्रत्येक बाब बालककेंद्रीच विचारात घेतली जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बालसाहित्यविषयक विचार येथे मांडावा असं मनात आलं, कारण बालकांच्या समग्र विकसनात बालसाहित्याचं मौलिक योगदान आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील फुलपाखरासारखा स्वच्छंद काळ म्हणजे बालपण. 'बालपणीचा काळ सुखाचा' ही उक्ती तर सर्वश्रुत आहे. बालकाचं जन्मस्थळ, बालपण जिथं रांगतं,खेळतं - बागडतं तो परिसर, त्या वयात त्याच्या अवतीभवती सतत असणारी माणसं, त्याच्या कानावर पडणारे शब्द,त्याला कळत - नकळत मिळत असलेला प्रत्येक अनुभव या सगळ्यांनाच बालमनात नकळत एक स्थान मिळत असते. बालकाचं आपलं स्वतःचं असं एक भावविश्व आकारत असतं. त्याच्या व्यक्त होण्याला स्वतंत्र धुमारे फुटण्याची हळूहळू सुरुवात झालेली असते. मन

टिपकागदाप्रमाणं भवताल टिपत असतं, नवनव्या गोष्टी उत्सुकतेनं ग्रहण करत साठवत असतं. हेमंत ऋतूत आपलं शरीर जसं ऊर्जा साठवतं अगदी तसंच. सुपीक जमिनीत पावसाचं पाणी सहज मुरावं तसं बालमनात अनेक गोष्टी मुरत जातात. भविष्यात त्यातूनच उमलून येण्याच्या, कलानिर्माणाच्या शक्यता असतात. येथे एक उदाहरण देता येईल. रवींद्रनाथ टागोर यांच्या कलासक्त मनावर व साहित्यनिर्मितीवर त्यांच्या बालपणाचा मोठा प्रभाव असल्याचं आपणास दिसून येते. त्यांच्या बालपणातील एक प्रसंग असा आहे - बाल रवींद्रनाथांना एकदा त्यांच्या नोकरानं एका खोलीत विशिष्ट जागी बसवलं व खडूनं सभोवार रेषा आखून सांगितलं की, 'खबरदार! या रेषेबाहेर जाशील तर!' बंद खोलीत एका मर्यादित जागेत त्यांना खूप वेळ राहावं लागलं. त्या खोलीला एक खिडकी होती. बाल रवींद्रनाथ त्या खिडकीतून बाहेरच्या एका छोट्या तळ्याकडं, त्या तळ्यात स्नानाला येणाऱ्या माणसांकडं आणि जवळच असलेल्या केळीच्या झाडांकडं एकटक पाहत बसले. या सर्व आठवणी नंतर त्यांच्या गद्य आणि पद्य लेखनात ललित्यानं आल्या आहेत.

बालवयात जर मुलांना सकस, प्रेरक आणि मूल्यवान साहित्य वाचायला मिळालं, ऐकायला मिळालं तर एक समृद्ध व्यक्तिमत्त्व घडण्याच्या दृष्टीने ते मौलिक ठरू शकतं. पंचतंत्र, इसापनीती, सिंहासन बत्तिशी, हितोपदेश, चांदोबा, अरेबियन नाईट्‌स, अकबर-बिरबल, वेताळ पंचविशी, विविध बाल लोककथा इ. हा तर बालकांसाठीचा सदासर्वकाळ खजिना आहे. बालमनाला ज्याची ओढ असते अशी राजा-राणी, राजकन्या, पऱ्या, देवदूत, बोलणारे प्राणी-पक्षी, झाडं तसेच जादूगार, राक्षस, चेटकीण, सद्‌गुणी-दुर्गुणी माणसं अशी पात्रं या अजरामर साहित्यात अवतरली आहेत. मुलं त्यात रमून जातात. निखळ करमणूक, नकळत बोध असं त्यातून घडत जातं. लहानांना या गोष्टी सांगता-सांगता मोठेही त्यात कधी रमून जातात, स्वतःच्या बालपणात हरवतात हे कळतही नाही. बालसाहित्य लेखनाची ही परंपरा पुढेही कायम राहिली आहे.

मराठी साहित्यसृष्टीतही कमी - अधिक प्रमाणात बालसाहित्याचे लेखन होत आलेले आहे. बालकवी, गोविन्दाग्रज, कृ. भ. निकुंभ, ग. ह. पाटील, वि. म. कुलकर्णी, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, इंदिरा संत, शान्ता शेळके अशा अनेक थोर लेखकांनी मोठ्यांसोबतच लहानग्यांसाठीही साहित्य लिहिले. कथा, कविता लिहिल्या. बालपणीचे स्वतःचे जग आणि कल्पित जगाचा मेळ त्यांनी अशा लेखनात घातला. अलीकडच्या काळात भारत सासणे, दिलीप प्रभावळकर, संगीता बर्वे, ल. म. कडू, दासू वैद्य, माधुरी पुरंदरे, राजीव तांबे, नीलिमा गुंडी, फारूक काझी, एकनाथ आव्हाड या व अशा अनेक लेखकांचं बालसाहित्य मुलांचं भावविश्व समृद्ध करत आहे.

आता 'बालसाहित्य' म्हणजे केवळ मोठ्यांनी लहानांसाठी लिहिलेले साहित्य

अशी संकल्पना राहिलेली नाही तर बालवयातील,किशोरवयातील मुलंही लहानांच्या भावविश्वातील गोष्टी कथाकवितांतून काही प्रमाणात लिहू लागली आहेत व ते पाठ्यपुस्तकांतून, नियतकालिकांतून प्रकाशित होऊ लागले आहे. 'चंपक', 'कुल्फी', 'शिक्षण विवेक', 'किशोर', 'चिकू पिकू' अशी अनेक नियतकालिके बालकांसाठी वैविध्यपूर्ण व कालसुसंगत लेखन प्रसिद्ध करताना दिसत आहे. आजच्या काळात केवळ मुद्रित स्वरूपातच बालसाहित्य प्रसिद्ध होत नाहीय, तर ई-बुक, ऑडिओ बुक, पॉडकास्ट अशा आधुनिक साहित्य रूपातही ते लहानग्यांसाठी उपलब्ध होत आहे.

लहान मुलांसाठी लेखन करणं वाटतं तितकं सोपं नाही. त्यांचं भावविश्व मूर्त करणं, त्याला अद्‌भुततेची जोड देणं हे कसब बालसाहित्यिकांना साधावं लागतं. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या, हातोहाती खेळण्याप्रमाणं मोबाईल असण्याच्या काळात आणि समाज माध्यमांचा प्रचंड रेटा असलेल्या काळात तर लहान मुलांना पुस्तक वाचनाकडे वळवणं, त्यात गुंगवून ठेवणं आव्हानात्मक होत चाललं आहे. कल्पनारम्य, चमत्कृतिपूर्ण जादूई विश्वाकडून वास्तविक जगाकडे त्यांना घेऊन येणं हे बालसाहित्यिकांपुढचं आव्हान आहे. मुलांचं कुतूहल शमवण्याबरोबरच त्यांची कल्पनाशक्ती उमलवणारं, बुद्धीला चालना देणारं, मूल्य रुजवणारं साहित्यही त्यांच्यासमोर असणं आवश्यक आहे.

बालसाहित्य निर्मितीची ही नस ओळखून 'राजहंस'ने विपुल व सकस बालसाहित्य आजवर प्रकाशित केले आहे. आताही करत आहे. निसर्गाकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन देणारं ल. म. कडू यांनी लिहिलेलं 'खारीच्या वाटा' हे पुस्तक तसेच दिलीप प्रभावळकर लिखित 'बोक्या सातबंडे'चे दहा भाग ही त्यांतील महत्त्वपूर्ण पुस्तके आहेत. या पुस्तकांना साहित्य अकादमीचा 'बालसाहित्य पुरस्कार' मिळाला आहे. याशिवाय राजहंस प्रकाशित वीणा गवाणकर यांचं 'किमयागार कार्व्हर', राजीव तांबे यांची 'गंमत शाळा भाग १ ते ३', 'कोंबडू आणि इतर कथा' या मालिकेतील पुस्तकं, वर्षा गजेंद्रगडकर यांची 'मिनूचा दोस्त', 'रोहनचा रविवार' व इतर पुस्तकं, माधवी भट यांची 'जुईचे पत्र', 'लहान माझी बाहुली' ही पुस्तकं, मुग्धा मणेरीकर यांचं 'निसर्गातले सखे - सोबती' व 'छोट्यांचा मोठा प्लॅन व इतर गोष्टी' हे सर्व बालसाहित्यही वाचकांच्या पसंतीस उतरले आहे. बालकांसाठी याही पुढे रंजक आणि उद्बोधक साहित्य निर्माण करण्याचा राजहंसचा मानस आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या, तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आजच्या युगात सुजाण, सजग पालक आपल्या लहानग्यांपर्यंत हे बालसाहित्य पोहचवतील, त्यांच्यासमवेत सहवाचनाचा, त्यावरील संवादाचा आनंद घेतील अशी आशा आहे. आपल्या देशाची भावी सुजाण, विवेकी पिढी त्यातूनच आकाराला येणार आहे.

***डॉ. प्रिया निघोजकर***, कार्यकारी संपादक

## ‘राजहंसी’ विविधा



गुरुदत्तच्या चित्रनिर्मितीच्या ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमीबरोबरच सदर पुस्तकात गुरुदत्तच्या चित्रपटांचा कथावस्तू, घाट, तंत्र आणि आशय या अंगांनी विचार केला आहे.

### गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास चित्रित करणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी!



### ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

मृणालिनी चितळे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)



पंचक्रोशीतला वतनदारांचा वाडा. वैभवशाली, सालंकृत लक्ष्मीसारखा देखणा...
वाड्यात अधूनमधून दिसणारा मूळपुरुष नाग...
आणि घरातल्या कर्त्या, सवाष्ण स्त्रियांना अल्पायुष्याचा शाप... काळाच्या कुपीत दडलेली रहस्यं उलगडत जाणारी कादंबरी.

### सवाष्ण

डॉ. क्षमा गोवर्धने शेलार

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी विशेष

## ‘पानिपत’कार विश्वास पाटील

*‘राजहंस प्रकाशन’ आणि ‘अक्षरधारा’ यांच्या संयुक्त विद्यमाने १२ ऑक्टोबर २०२५ रोजी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, पुणे येथे कादंबरीकार विश्वास पाटील यांची मुलाखत प्रशांत दीक्षित यांनी घेतली. त्या मुलाखतीचा हा संपादित अंश...*

*आपण आपल्या वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी ‘आंबी’ ही लघुकादंबरी लिहिलीत. इतक्या लहान वयात आपले अनुभव नेमक्या शब्दांत मांडायचं कसब कसं साधलंत?*

‘असाध्य ते साध्य, करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे।’ अवघ्या सतराशे लोकवस्तीच्या माझ्या गावात ग्रंथालय नव्हतं. मराठी भाषेबद्दल आत्यंतिक मनस्वी ओढ असल्यानं मिळेल तिथे, मिळेल तसं मी तुफान वाचत असे. पाचवी, सहावीत शाळेतील एका समाजवादी शिक्षकांमुळे साने गुरुजींचं संपूर्ण साहित्य मी वाचलं. पुढे नववीत मामा शिक्षक असलेल्या पाचगणीच्या शाळेत एका वर्षात मी २३४ पुस्तकं वाचून काढली. त्याची यादीसुद्धा आईनं अनेक वर्षं जपून ठेवली होती. यात माडगूळकर बंधू, शंकर पाटील, मिरासदार, र. वा. दिघे अशा सर्व ग्रामीण लेखकांच्या लिखाणाचा, आचार्य अत्रेंच्या लिखाणाचा समावेश होता. झपाटून केलेल्या या वाचनामुळे माझ्या लिखाणाला नकळत शब्दांचा लहेजा प्राप्त आला.



दहावीला असताना ‘तरुण भारत’च्या कथास्पर्धेत माझ्या ‘कायदा’ कथेला पारितोषिक मिळालं. खेड्यात असूनही मी अकरावी, बारावीत असताना ‘मराठा’साठी मुंबईला कथा पाठवायचो. शिरीष पै त्या कौतुकानं प्रसिद्ध करीत. यानंतर नवलेखक अनुदान योजना आली. यात आपल्याला संधी मिळावी म्हणून मी पाच-सात दिवसांमध्ये कादंबरी लिहिली. तीच ‘आंबी’ कादंबरी. तिला अनुदान मिळालं आणि कॉलेजच्या पहिल्या-दुसऱ्या वर्षातच ती प्रसिद्धही झाली.

*व्यक्तींचं, समाजाचं, आजूबाजूच्या घटनांचं निरीक्षण करायला एक लेखकाची नजर लागते. ती नजर तुमच्या या (आंबी) कादंबरीतही दिसते. नवोदित लेखक असताना तुम्ही हे कसं साध्य केलंत?*

वाचनामुळे नजरेला आपोआप सरावलेपणा आला. आमच्या गावासमोरून वाहणाऱ्या वारणा नदीतून पाणी भरण्यासाठी समोरच्या गावातली एक मुलगी यायची. ती पाणी भरायची आणि घडा डोक्यावर ठेवायची. चार-पाच पावलं चालायची. पुन्हापुन्हा पाठीमागे वळून माझ्या गावाकडे बघायची. तिच्या डोक्यावरच्या माठाबरोबरच तिचे डोळेही पाझरत असल्याचं माझ्या लक्षात आलं. ‘असं का?’ असं मी वडिलांना विचारलं. ते म्हणाले, ‘‘आपलं गाव हे तिचं माहेर. पण भावाचा हिस्सा आहे तो नव्या कायद्याप्रमाणे तिच्या नवऱ्यानं वाटून घेतला आणि त्यामुळे तिचं माहेर तुटलं. त्यामुळे ती पुन्हापुन्हा आपल्या माहेराकडे, आई-वडिलांच्या गावाकडे वळून पाहते आणि तिच्या डोळ्यांत अश्रू येतात.’’ ही बाब माझ्या लक्षात राहिली. लग्नासाठी मुलगी पाहण्याचा एक प्रसंगही माझ्यावर परिणाम करून गेला. ते लग्न ठरलं, सुपारी फुटली आणि मग ती सतरा-अठरा वर्षांची मुलगी एखाद्या भात्यातून बाहेर पडलेल्या तीरासारखी बाहेर आली आणि बैठकीत आपल्या वडिलांना म्हणाली, ‘‘बाबा, आपल्या शेतातला औताचा बैल म्हातारा झाला आणि नवा बैल पाहण्यासाठी म्हणून गेले तीन-चार महिने तुम्ही वेगवेगळ्या आठवड्याच्या बाजाराला, बैलबाजाराला गेलात. पण जावई मात्र दोन मिनिटांत कसा काय पसंत केला?’’ हा सवाल तिनं केला आणि त्या क्षणाला मला ‘आंबी’ कादंबरीची नायिका सापडली.

*‘आंबी’ कथेचा बाज एकदम वेगळाच आहे. आंबीचं लग्न ठरतं. तिचा नवरा षंढ निघतो आणि तिचं संपूर्ण आयुष्य उद्‌ध्वस्त होतं. एक वेगळा विषय तुम्ही ताकदीनं पेललात, याचं कौतुक वाटतं. तुमचा म्हणून एक सशक्त सामाजिक स्वर लेखनात उतरलाय. तुम्ही गाजलात ते ‘पानिपत’मुळे; खरं तर ‘आंबी’, ‘पांगिरा’, ‘झाडाझडती’ यांचंही लेखन तुम्ही समर्थपणे केलंय. तुम्ही म्हटलंय की, ‘मी खरा सामाजिक लेखक. पण अपघाताने ऐतिहासिक लेखक झालो.’ तर हा अपघात कोणता?*

मी नवोदित लेखक असताना दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा वगैरेचे बरेच कार्यक्रम व्हायचे. तिथे आम्हा नव्या लेखकांना कथाकथन वा अन्य लेखन सादर करण्यासाठी बोलवायचे. अनेकदा कार्यक्रम लांबला की नवोदित असल्यानं आमचं नाव कापलं जायचं. मी नाराज व्हायचो. ते पाहून एकदा वडील म्हणाले, ''कुंपणावरच्या चिमण्या टिपण्यापेक्षा वाघाला मारायचा प्रयत्न कर. काहीतरी मोठं काम कर. उगाच प्रत्येक कार्यक्रमाला जाऊन वेळ फुकट दवडू नकोस.'' हे वाक्य माझ्या मनावर कोरलं गेलं. याच काळात रियासतकार सरदेसाईंचा 'द न्यू हिस्टरी ऑफ मराठा' या नावाचा ग्रंथ माझ्या वाचनात आला. रिसायतकार देसाईंचं इंग्रजीमधलं 'पानिपत' हे ३०-४० पानांचं प्रकरण मी वाचलं आणि त्यातला नजीब खान माझ्या मनाला टोचत राहिला. पानिपतचा इतिहास म्हणजे मराठी माणसाच्या व्यवहाराचा, त्याच्यातल्या गुण-दुर्गुणांचा, यशापयशाचा सुंदर आरसा आहे. म्हणून मी हा विषय निवडला. माझ्या सुदैवानं या विषयाचा पर्वत मी चढलो नसलो, तरी मला शिखर दिसलं होतं. कुठलीही घाई न करता सलग जवळजवळ तीन-चार वर्षं अभ्यास करून सहा वर्षांनंतर मी ती कादंबरी लिहिली. पहिल्यांदा लिहायचा प्रयत्न केला. साठ पानं मी लिहिली आणि नंतर माझ्या लक्षात आलं, की मला जे काही सांगायचंय ते अजून नीटपणे उतरत नाहीये. त्यामुळे पुन्हा सात-आठ महिने अभ्यास केला आणि नंतर लिहिलेली कादंबरी 'राजहंस'चे सर्वेसर्वा दिलीप माजगावकरांनी अथपासून इतिपर्यंत जशीच्या तशी छापली.

*खरंय. या कादंबरीची ४७वी आवृत्ती आता येतीय. मधु मंगेश कर्णिक यांनी म्हटलेलं अगदीच अन्वर्थक आहे, की प्रकाशक आणि लेखक यांच्या एकत्रित ताकदीमुळे 'पानिपत' ही एक समर्थ कादंबरी सिद्ध झाली. मराठी पुस्तकांच्या खपाची एकीकडे चिंता वाटत असताना अशी काही पुस्तकं विक्रीचा विक्रम करतात, हेही*

अनेक इतिहासकार आणि ललित लेखकांनी वेध घेतलेली इतिहासातील घटना. मराठ्यांच्या इतिहासातील शौर्याची शोकांतिका चित्रित करणारी ऐतिहासिक कादंबरी.




पानिपत

विश्वास पाटील

आवृत्ती सेहेचाळिसावी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)

*पाहण्यासारखं आहे. ऐतिहासिक कादंबरीत न घडलेले प्रसंगही फुलवावे लागतात. 'पानिपत'मध्ये असे काही प्रसंग आहेत का?*

मराठ्यांचा इतिहास भव्य दिव्य 'लार्जर दॅन लाईफ' असा आहे. आपण सहज म्हणतो दहा हजार घोडी होती. घोड्याचा चंदी-चारा, अंघोळ, काळजी घेण्यासाठी एक माणूस लागायचा, अल्पबचत केली तरी दहा हजार सैनिकांसाठी सात हजार हशम होते. पाणी वाहण्यासाठी कमीतकमी सहाशे ते सातशे भिस्ती होते. हे वास्तव आहे. मराठ्यांच्या इतिहासाचा आपण जर खोलवर अभ्यास केला तर कल्पनेतील घुसळण करण्याची गरजच लागणार नाही. 'पानिपत' लिहिण्यापूर्वी मी मराठीतल्या काही कादंबऱ्या वाचल्या. एक चांगली कादंबरी होती, बाजीरावांवरची, पण त्या लेखकानं पेशव्यांच्या घरातील गोष्टी, बाजीरावांनी स्त्रियांशी मारलेल्या गप्पा यावरच अनेक पानं खर्ची घातली आहेत. मग ते लढाई कधी करणार, असा विचार माझ्या मनात आला. 'पानिपत'च्या निमित्तानं मला ही कादंबरी रणांगणावर न्यायची होती, आणि त्यात मी यशस्वी झालो. अर्थात त्यात खूप अडचणीही आल्या. माझ्या आधी 'दुर्दैवी रंगू' किंवा 'पानिपतची मोहीम' वगैरे पानिपतवरच्या काही कादंबऱ्या आहेत. पण त्यामध्ये नजीब खान हे नाव नाही. नजीब खान हाच मराठ्यांचा खरा शत्रू होता. ई-मेल, पीडीएफ नसण्याच्या काळात नजीब खानची दोन उर्दू आणि पारशीमधील चरित्रं जी इथे उपलब्ध नव्हती, ती लंडनच्या ग्रंथालयातून मागवून भाषांतरित करून घेतली.

*ती तर तुमची खासियत आहे. एवढी मेहनत घेणारा, बैठक मारून लेखन करणारा लेखक अलीकडच्या काळात तर अगदी दुर्मीळ आहे. आता तुमच्या पुढच्या लेखनाकडे वळू. लेखन करणं म्हणजे एक साधना असते. आपण त्यासाठी अभ्यास कसा करता? 'महानायक' ही आपली कादंबरीही गाजली. यात तथ्य आणि कल्पना यांची सांगड आपण कशी घातलीत? चरित्रलेखन करायचं असेल तर त्याच्यात नवनिर्माणाला किती संधी असते?*

नेताजी सुभाषचंद्र बोस घरातून कसे बाहेर पडले, काबुलपर्यंत कसे गेले यावर अनेक पुस्तकं आहेत. पण प्रत्यक्ष महायुद्धात त्यांची काय भूमिका होती. जपाननं त्यांना किती मदत केली. किती फौज त्यांच्यासोबत होती. त्यांच्याबरोबर तीन जपानी तुकड्या म्हणजे साठ हजारांची फौज होती. सिंगापूरपासून हजारो किलोमीटर पायी चालून ती इम्फाळ, कोहिमापर्यंत आली. तिथे त्यांचा पराभव का झाला, अशा अनेक गाळलेल्या जागा होत्या आणि त्या भरणं आवश्यक होतं. तर त्या दृष्टिकोनातून मलाया - ब्रह्मदेशापासून मी इम्फाळ कोहिमापर्यंतचा प्रवास अनेक गोष्टी टिपत केला. म्हणूनच जपानी कमांड आणि हिंदुस्थानी आजाद हिंद फौज यांच्यातले वाद-विवाद, एकत्रित लढाया हे मी 'महानायक'मध्ये मांडू शकलो. सुभाषबाबू आणि

नेहरू यांच्याबद्दल प्रचंड साहित्य उपलब्ध होतं. पण यातून नेमकं किती मांडावं, हा प्रश्न होता. एका बाजूला सुभाषबाबू, नेहरू आणि गांधी. या तिघांमधला संघर्ष टिपणं आव्हानात्मक होतं. यासाठी काही वेगळा प्रसंग निर्माण केला पाहिजे असं ललित लेखक म्हणून मला वाटायचं. 'जवाहरला लवकर काँग्रेस अध्यक्ष बनवा.' असं मोतीलाल नेहरूंनी गांधीजींना लिहिलेलं पत्र माझ्या अभ्यासात आलं. या माहितीचा मी आधार घेतला, गांधीजींना सर्कस पाहायची हौस होती. त्यांना बालपणी पाहिलेली सर्कस आठवली. त्यातल्या रिंगमास्टरच्या तालावर सर्कस थरथर कापायची. सर्कसच्या मालकानं दोन सिंहाचे छावे आणले. ते खूप दंगा करायचे, त्यांच्यामुळे रिंगमास्टरनं लावलेली शिस्त बिघडली. मग त्यानं सर्व प्राणी जंगलात नेले. हळूच सिंहाच्या छाव्यांच्या या पिंजऱ्याचा दरवाजा उघडला. त्यातून एक छावा बाहेर पडताच दरवाजा लावला. मग एकच सिंहाचा छावा सर्कशीत राहिला आणि पुढे तो काही आवाज न करता रिंगमास्टरचं ऐकून काम करू लागला. हेच आठवून गांधीजींनी कलकत्ता अधिवेशनात जाणीवपूर्वक सुभाषबाबूंना बाहेर काढलं आणि अखिल भारतीय काँग्रेस नावाची सर्कस त्या रिंगमास्टरच्या हातून त्यांना हवी तशी वापरता आली. हे एक उदाहरण जे सांगते, ते साठ-सत्तर पानांतही मांडता येणार नाही. त्यामुळे खूप बारकाईनं योजना करावी लागते. इतिहास लोणच्यासारख्या डोक्यात मुरवावा लागतो.

*गाजलेले कादंबरीकार अनेकदा पुनर्लेखन करतात. तुमची लेखनप्रक्रिया कशी आहे?*

आपण आपल्या लेखनावर खूश व्हायचं नाही, तुमचे कान पकडणारे आणि तुम्ही इथे चुकला आहात, पुन्हा नव्यानं लिही असं सांगणाऱ्या मित्रांची संगत हवी.


विकास, धरणे आणि त्यामुळे उद्ध्वस्त होणारं
ग्रामीण जीवन! त्यामुळे होणारं स्थलांतर!
त्यापायी गाव आणि देव पाठीवर बांधून चाललेल्या
हजारो धरणग्रस्तांची मन सुन्न करणारी,
साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबरी.




झाडाझडती

विश्वास पाटील

आवृत्ती सत्ताविसावी । किंमत : ₹ ५२५/- । (ट.ख. ₹ ५०)

महानायक कादंबरीच्या वेळी मला एका दुसऱ्या प्रकाशकानं दहा लाखाची ऑफर दिलेली होती. मी त्यांना सांगितलं की, ''मी ही कादंबरी राजहंसलाच दिलेली आहे.'' मी ते बाड 'राजहंस'मधील मंडळींना वाचायला दिलं. नंतर माझ्या लक्षात आलं की दिलीप माजगावकर आणि त्यांचे संपादक सगळे खूप नाराज आहेत. माझी कादंबरी छापण्यायोग्य झाली नव्हती. मनापासून प्रचंड अभ्यास केला होता; पण त्या मानानं कागदावर लिखाण उतरलं नव्हतं. मग मी पाचसहा महिन्यांची मुदत मागितली आणि पुन्हा नव्यानं कादंबरी लिहिली. न्यूयॉर्क फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये 'स्क्रीन प्ले' शिकवताना पुनर्लेखन हेच उत्तम लेखन असं सांगितलं जातं. पानिपतचे सगळे तर्जुमे मेंदूत तयार झाले होते. अनेकदा घुसळण झाली होती. झपाटलेपण लेखकात जोपर्यंत उतरत नाही, तोपर्यंत उत्तम कलाकृती होत नाही.

*तुमचं भाग्य आहे की तुम्हांला सुरुवातीच्या काळापासूनच चांगले संपादक मिळाले. आनंद यादव, म. द. हातकणंगलेकर, शंकर सारडा अशा अनेकांचं साहाय्य, मार्गदर्शन तेव्हा आपल्याला लाभलं. अलीकडच्या काळात समीक्षक आणि संपादकांची शिकवण, मार्गदर्शन याची उणीव तुम्हांला जाणवते का?*

'हंस', 'सत्यकथा', 'किर्लोस्कर'सारखी मासिकं संपल्यानं मराठी लेखकांना व्यासपीठ राहिलेले नाही. सर्व दिवाळी अंक वाचले जातात असंही नाही. दुर्दैवानं नव्या लेखकांसाठी ही खूप मोठी पंचाईत आहे. पण त्यांनी स्वत:च्या वाटा स्वत: शोधल्या पाहिजेत. प्रशंसक मित्रांचा अनुनय न करता चूक-बरोबर सांगणारे मित्र असले पाहिजेत. मला ऐतिहासिक कादंबऱ्या लिहायच्या नव्हत्या. 'पानिपता'वर कोणी उत्तम ग्रंथ लिहिला असता, तर मी 'पानिपत' कादंबरी लिहिली नसती. मराठीत काही लेखकांनी अतिशय उत्तम संशोधन केलं. पण ते मांडण्याचं लालित्य त्यांच्याकडे नाही. पण काही इतिहासकार इतके ललितरम्य आहेत की त्यांचं इतिहासलेखनसुद्धा कादंबऱ्या वाटतात. या दोन्हीचा योग्य मिलाफ करायला हवा.

*'महानायक'नंतर तीन-चार वर्षं तुम्ही विश्रांती घेतली. तो काळ तुम्ही केवळ वाचनात घालवलात. इंग्रजी व अन्य भाषांमधील पुस्तकं वाचलीत.*

हो. मराठीत ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्या मी अभ्यासल्या. स्त्री समजून घ्यायची झाली तर अरविंद गोखले आणि अण्णा भाऊ साठे यांना पर्याय नाही.

अण्णा भाऊंच्या लघुकथेतील स्त्रीकथा राष्ट्रीय दर्जाच्या आहेत. त्यात महानगरातल्या, ग्रामीण, सरंजामी, कुलीन घरातल्या स्त्रिया आहेत. मी आचार्य अत्रेही अभ्यासले. त्यांची नाटकं मला पाठ होती. विशेषत: अण्णा भाऊंची 'फकिरा' आणि 'माकडीचा माळ' यांनी मला प्रभावित केलं. मी पाचवीत असताना मुंबईवरून

एका गिरणी कामगारानी नाथ माधव यांची 'वीरधवल' नावाची कादंबरी आणली. ती पाचशे पानांची कादंबरी मी रात्रंदिवस वाचून पूर्ण केली. पहिल्यांदा मला मोठ्या पटाची प्रचिती आली.

कथानकं, उपकथानकं समजली. आठव्या इयत्तेत मी र. वा. दिघेची 'सराई' नावाची कादंबरी वाचली, 'आई आहे शेतात' नावाची कादंबरी वाचली. या कादंबऱ्या रशियन कादंबऱ्यांप्रमाणे विराट विश्व कवेत घेणाऱ्या आहेत. 'आई आहे शेतात' ही कादंबरी १९६५दरम्यान हिंदीत भाषांतरित झाली होती. ही कादंबरी वाचलेले हिंदीमधले अनेक नवलेखक, मोठे लेखक मला बिहार, उत्तर प्रदेशात भेटले. मी दोस्तोयेवस्की, टॉलस्टॉय, थॉमस हार्डी, जॉन स्टाइनवेक यांचं सर्व लिखाण वाचून काढलं. मी इंग्रजी वाङ्मयाचा विद्यार्थी असताना कादंबरीकार डॉ. शांतीनाथ देसाई आमचे विभागप्रमुख होते. त्यांच्याशी चर्चा करताना आम्हाला नाटक, कादंबरीबाबत खूप काही शिकायला मिळालं, मग सुरुवातीच्या माझ्या कथांवर मी काम केलं. आनंद यादवांकडे मी विचार भारतीसाठी मी लघु-कथा लिहिली होती, त्या कथेचं रूपांतर पुढे 'पांगिरा' कादंबरीमध्ये झालं.

*पांगिराच्या लेखनाबद्दल हातकणंगलेकर असं म्हणाले होते की, 'तल्लख चोचीत पकडलेलं वास्तव.' तुमची शैली लोकसाहित्यात जन्मलेली आणि रमलेली आहे, असंही ते म्हणाले होते. समाजातील शोषित घटकांना केंद्रस्थानी ठेवून आपण लेखन केलंत; आणि नंतर मात्र 'नागकेशर'सारखं वेगळ्या शैलीचं लेखन तुम्ही केलंत. ग्रामीण भागातील ही दोन वेगळी चित्रं पहिल्यापासून तुमच्या डोक्यात होती की ठरवून त्याची मांडणी केलीत?*

'पानिपत'च्या काळात माजगावकरांनी माझी पणशीकरांशी ओळख करून

अण्णा भाऊंच्या कार्यकर्तृत्वाच्या दशदिशा धुंडाळून,
दुर्मीळ कागदपत्रं शोधून, अण्णांचं जीवन व साहित्य
समृद्ध करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा खास शोध घेऊन;
कादबंरीकार विश्वास पाटील यांनी लिहिलेली
वाङ्मयीन चरित्रगाथा

अण्णा भाऊंची दर्दभरी दास्तान

विश्वास पाटील



आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

दिली. पणशीकरांना माझ्याकडून एक नाटक लिहून हवं होतं. म्हणून मी एक ‘सत्ताचक्र’ नावाचं नाटक लिहिलं होतं. त्याचे दोन अंक लिहिले, तिसरा अंक लिहायचा मी कायम कंटाळा केला. हे नाटक हाच ‘नागकेशर’चा पाया आहे. गावागावांमध्ये एवढे अत्याचार, अन्याय आहेत; ही आपल्याला कल्पनाच येत नाही. ‘नागकेशर’ कोरोनाच्या काळात आली. त्यामुळे वाचकांकडून दुर्लक्षित राहिली, पण आता लवकरच हिंदीत त्यावर टीव्ही मालिका येत आहे. एक साखरसम्राट आणि सत्तेसाठी झुंजणाऱ्या त्यांच्या दोन सुना यांच्यामधील पराकोटीचा संघर्ष हा या कादंबरीचा विषय आहे. मध्यमवर्गीय वाचकांनी यातील काही पाहिलेलं नाही. ‘घाशीराम कोतवाल’चे वंशज संपलेले नाहीत, हे बीड आणि आजूबाजूच्या जिल्ह्यांनी दाखवून दिलं. सर्वसामान्य नागरिकांसह मंत्र्यांपर्यंत अशी चित्रविचित्र पात्रं मला भेटली आहेत. ती सर्व ‘नागकेशर’मध्ये आली आहेत

*‘चंद्रमुखी’सारखी कादंबरी तुम्ही आधी इंग्रजीत लिहिली. त्याची शैली, हळुवारपणा किंवा एकूण मांडणी मराठीत आहे, तशी इंग्रजीत जमली होती का?*

इंग्रजी कादंबरीचं चांगलं स्वागत झालं. पण त्यापेक्षा तिच्यावर एक उत्तम सिनेमा आला, गाणी खूप गाजली. मराठी वाचकांनाही ती आवडली. तिच्या १२-१५ आवृत्त्या निघाल्या. पण खरं सांगायचं तर ती माझी फसलेली कादंबरी आहे. मला गीत - संगीताचं वेड आहे. आणि त्या कादंबरीवरच्या मुख्य व्यक्तिरेखांवर संशोधन किंवा नाट्य न धुंडाळता मी लावण्यांच्या चालीच शोधत बसलो आणि त्याच्यातच बराच वेळ घालवला. पुरेशी मेहनत त्यातील शब्दांवर घेतली नाही. त्या वेळेला माजगावकरांनीपण तेवढा विरोध केला नाही. पुढे काय होतं, की तुमच्या प्रेमात पडलेली माणसं प्रेमातच राहतात. लेखकासाठी हे उपयोगाचं नाही. सुरुवातीला शंकर सारडा छोट्या मोठ्या गोष्टीसाठी माझा कान धरायचे. तेसुद्धा माझे भक्त होऊन गेले आणि तेही उत्तम उत्तम म्हणायला लागले. कोणीतरी माझा कान पकडला असता आणि तू लिहिलं त्याच्यापेक्षा चांगलं लिहिण्याचं सामर्थ्य तुझ्यात जास्त आहे आणि ते अधिक वेगळ्या पद्धतीनं होऊ शकतं, असं जर झालं असतं तर कदाचित अजून ती कादंबरी उत्तम झाली असती.

*एका कादंबरीच्या लिखाणापूर्वी तुम्ही तमाशाबाबत वडिलांशी चर्चा केली, असं म्हटलं आहे. तुमच्या काही कादंबऱ्यांना तमाशाची पार्श्वभूमी आहे. महाराष्ट्रातील या परंपरेबद्दल तुम्हाला काय वाटतं?*

आपल्या डोक्यामध्ये पुन्हा दोन प्रकार असतात. संगीत बारी म्हणजे लोकांची खिसेकापू गँग, परंपरागत तमाशा वेगळा आहे. त्याच्यामध्ये राजा हरिश्चंद्रासारखे

उत्तम वग बघितलेले आहेत, विठाबाईंच्या उत्तम लावण्या, गाणी ऐकलेली आहेत. आमच्या वडिलांना उत्तम तमाशा पाहण्याचं वेड. मी विठाबाईंची तीन दिवस मुलाखत घेतली. चर्चा केली. विठाबाईंची बहीण केशर हिचा आवाज लता मंगेशकरांसारखाच होता. आम्ही ऐकलेला आहे. माधवराव गायकवाड यांच्याइतकी चांगली संभाजी महाराजांची भूमिका कोणीही केली नाही. त्यांना फडात घेण्यासाठी मोठी बोली लागायची. अभिनय, संगीत, उत्तम विनोद या सर्व अंगांनी तेव्हाचा तमाशा श्रीमंत होता. अण्णा भाऊ साठेंवर कादंबरी न करता तुम्ही ललित अंगानं चरित्रलेखन केलंत. 'महानगरी साहित्याचा उद्‌गाता' असं तुम्ही त्यांना म्हणता, त्याविषयी थोडं सांगा... लेखकाला जागरूक वाचक हवे असतात, तसे जागरूक प्रकाशकही लेखकाला हवे असतात. दिलीप माजगावकर नसते, तर अण्णा भाऊंवरचं माझं पुस्तक झालं नसतं. तेव्हा साधना मासिकानं अण्णा भाऊ साठे विशेषांक काढला होता. माजगावकरांसोबत असताना त्यातील काही बाबींबाबत मी विनोद शिरसाठ यांना फोन लावला. आमचं संभाषण ऐकून माजगावकर म्हणाले, "काय करणार तुम्ही याचं?" त्यावर "अण्णा भाऊंबद्दल नीट आलेलं नाही, ते येणं गरजेचं आहे. मला एखादा विस्तृत लेख लिहायचा आहे, साधनासाठी." असं मी म्हणालो. त्यावर माजगावकर म्हणाले, "लेख सोडा, याच विषयावर मला एक पुस्तक द्या." अण्णा भाऊंच्या खऱ्या साहित्याला कोणी, विशेषत: मोठ्या प्रकाशकांनी हात घातलेला नाही. समीक्षकांनीही त्यांची पुस्तकं हाती धरली नाहीत, 'माकडीचा माळ' कादंबरी १९६२ साली मॅजेस्टिकच्या केशवराव कोठावळ्यांनी प्रकाशित केली होती, तरी तिची नोंद मराठी साहित्यिकांनी घेतली नाही. आजही भटक्या आणि विमुक्तांचं एवढं दाहक


अडतीस कोटी देशबांधवांची गुलामीतून मुक्तता; याच एका प्राणप्रिय ध्येयासाठी एका कडव्या, लढवय्या देशभक्ताने अर्ध्या जगात मारलेली गरुडभरारी! देशोदेशींच्या दफ्तरखान्यांत आजवर अडकून पडलेल्या दुर्मीळ दस्तऐवजांचा, नव्या संशोधित कागदपत्रांचा वेध घेऊन चितारलेली नेताजींची अपरिचित जीवनकहाणी.



महानायक

विश्वास पाटील

आवृत्ती पंचविसावी । किंमत : ₹ ६५०/- । (ट.ख. ₹ ५०)

जीवन दाखवणारी ही भारतातली सर्वांत आधी लिहिली गेलेली कादंबरी आहे. 'स्मशानातलं सोनं' ही त्यांची कथा मी चीनमध्ये वाचून दाखवली होती व त्याचा प्रभाव तेथील साहित्यिकांवर पडला होता. राजहंस प्रकाशन उच्चभ्रू, प्रतिष्ठित संस्था आहे. त्याचे सर्वेसर्वा मला या गावकुसाबाहेरच्या एवढ्या चांगल्या लेखकाबद्दल लिहायला सांगताहेत, हे पाहून माझ्या हातातलं एका उत्तम कादंबरीचं लेखन बाजूला ठेवत मी त्या विषयाला हात घातला आणि त्यांनी ते प्रकाशित केलं.

*अण्णा भाऊंच्या प्रतिभेची दखल तत्कालीन सरकारनं घेतली नाही. ते दुर्लक्षितच राहिलं, याबाबत तुमचं मत...*

महाराष्ट्राच्या मंत्रालयाकडे जाणारा रस्ता हा हुतात्म्यांच्या रक्तानं रंगलेला आहे. त्या वेळी सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली चार लाखाचे मोर्चे निघाले होते. पण दुर्दैवानं 'ज्याच्या हाती ससा तो पारधी' त्याप्रमाणे ज्यांच्या हातात सत्ता त्यांच्या हातात (महाराष्ट्राचा) मंगल कलश असं झालं. जे लढले त्यांची नोंद मंत्रालयाच्या पायरीवर आजसुद्धा कोणी घेतलेली नाही. त्यामध्ये अण्णा भाऊ एकटे नव्हते. आचार्य अत्रेंसारखा खंबीर पर्वतासारखा पुरुष होता. गवाणकर, समाजवादी, मार्क्सवादी नेते, डांगे, एस. एम. जोशी, माडखोलकरांसारखे लेखक, वा. रा. कोठारींसारखे संपादक, लालजी पेंडसे आदी होते. त्यांना काही मिळालं नाही. अण्णा भाऊंचं सूत्रबद्ध खच्चीकरण केलं गेलं असं माझं मत आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षानं राष्ट्रीय स्तरावर तीन लेखकांना 'प्रोजेक्ट' केलं. त्यांच्यामध्ये मद्रासचे जयकांतन, बंगालच्या महाश्वेतादेवी आणि महाराष्ट्राचे अण्णा भाऊ साठे होते. उर्वरित दोघांचंही लेखन मी वाचलं. पण त्यांच्यापेक्षाही कितीतरी पल्लेदार उत्तम कथा अण्णा भाऊंनी लिहिल्या आहेत. तमिळ आणि बंगाली भाषिकांनी आपापले लेखक किती श्रेष्ठ होते, हे दिल्लीपर्यंत ओरडून सांगितलं; पण आपण अण्णा भाऊंची साधी दखलही घेतली नाही. जयकांतन आणि महाश्वेतादेवींना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. अण्णा भाऊंच्या अनेक कथा खूपच वरच्या दर्जाच्या आहेत. हे सगळं मला अभ्यासांती आढळून आलं. माजगावकरांनी मला सुचवेपर्यंत मलासुद्धा एवढी कल्पना नव्हती. भारतीय स्त्रियांविषयी लेखन करणारे प्रेमचंद, शरदचंद्र मी वाचले. या दोघांनंतर भारतीय स्त्री समजलेला मोठा लेखक म्हणजे अण्णा भाऊ साठे.

स्वातंत्र्यानंतर महानगरांमध्ये कसं लोकांचं जीवन बटबटीत झालं, हालअपेष्टांना सामोरं जावं लागलं याच्या कथा अभ्यासण्यासाठी चार मुख्य महानगरांचा मी अभ्यास केला. त्या त्या वेळी त्या त्या साहित्यात काय लिहिलं आहे, याचा अभ्यास केला. तुलना करता मला जाणवलं की अण्णा भाऊंनी अन्य कोणाही पेक्षा चांगलं, मूलभूत काम केलं आहे. म्हणून मी त्यांना भारतातील 'महानगरीय साहित्याचा

उद्गाता' असं म्हणतो.

*खरंय. अण्णा भाऊंच्या चरित्रातील अनेकच मौलिक गोष्टी आपल्या या पुस्तकामुळे वाचकांसमोर आल्या आहेत. अण्णा भाऊंना डॉ. होमी भाभा भेटले होते वगैरे. 'लस्ट फॉर लालबाग' ही तुमची आवडती कादंबरी. ती वेगळ्या कारणानं गाजली. तुमच्यासारख्या सिद्धहस्त लेखकावर वाङ्मयचौर्याचा आरोप झाला, तेव्हा मनाला किती वेदना झाल्या?*

साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद जाहीर झाल्यावरही मी सांगितलं, की या कादंबरीतला एखादा परिच्छेद किंवा पान मी कुठून चोरून लिहिलं आहे, असं जर सिद्ध केलं तर मी हातात लेखणी धरणार नाही. ज्यानं दहा हजार पानं लिहिली, त्याला दुसऱ्याचं चोरायचं काय कारण. ही कहाणी माझ्या घरातली, गावातली कहाणी होती. माझ्या गावातल्या प्रत्येक घरात एक तरी गिरणी कामगार होता. माझे दोन सख्खे चुलते गिरणी कामगार होते. माझ्या मावशीची लालबागला खानावळ होती. त्यामुळे मी माझ्या लहानपणी गिरण्यांच्या भोंग्याच्या आवाजानं उठणारी मुंबई पाहिलेली आहे. एका दहा बाय दहाच्या खोलीत ८० लोकं राहायचे. गिरण्यांच्या पाळ्यांप्रमाणे झोपण्याच्या पाळ्या लावायचे. माझ्या नशिबानं पुढे मी मुंबई जिल्ह्याचा जिल्हाधिकारी झालो. गिरणी कामगाराचा पुतण्या म्हणून वस्तीत राहिलेला पोरगा आणि कलेक्टर या दोन्ही भूमिकांमधून मला मुंबई पाहायला मिळाली.

भारतीय स्तरावर ही कादंबरी प्रचंड गांभीर्यानं घेतली गेली. याचं हिंदी, इंग्रजीत भाषांतर येत आहे. चार वर्षांपूर्वीच ती कन्नडमध्ये आली. लवकरच मल्याळममध्येही ही कादंबरी वाचायला मिळेल. दोन महिन्यांत तिच्या तीन आवृत्त्या आल्या. मला याचा अंदाज नव्हता. साठ गिरण्या कुणी गिळल्या, हजारो कोटींचा 'एफएसआय'

उद्ध्वस्त खेडी, वैराण राने, पाण्याचा गैरवापर,
दुष्काळाचे शापित गाणे, टपोऱ्या कणसांसारखी
मातीतली माणसे आधुनिकीकरण, सहकार अन्
'लोकशाय'चा फेरा गावच्या काळ्या-पांढरीचे एका
तपाचे तीन-तेरा हाच पांगिराचा लोकविलक्षण पसारा!

पांगिरा

विश्वास पाटील




आवृत्ती सतरावी । किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

कुणी खाल्ला? हे लोक इतके बिलंदर होते; यांनी अख्खी मुंबई पचवली, रिचवली, त्यांना एक मराठी लेखक आणि त्याची कादंबरी पचवणं फारसं अवघड नव्हतं. त्यामुळे त्यांनी कादंबरीच्या वास्तवावर विषयावर चर्चा होऊच दिली नाही. उलट आमचाच एक नातेवाईक उभा करून चोर म्हणून धमाका उडवला आणि कादंबरी बदनाम करण्याचा प्रयत्न केला. आजही लालबागमध्ये राहिलेली माणसं, तरुण जेव्हा भेटतात तेव्हा सांगतात ही आमच्याच आई-बापाची कहाणी आहे.

*प्रत्येक लेखकाला धास्ती असते. आपल्यावर कुठून कधी झुंडशाहीचे प्रयोग होतील किंवा आपल्यावर लोक चालून येतील, हे सांगता येत नाही. झुंडशाहीच्या प्रभावामुळे आपल्या मनातील विचार, कथेच्या बीजांवर परिणाम होतो का, उत्साह कमी होतो का? प्रतिभा आक्रसते का?*

महानायक कादंबरीच्या अभ्यासासाठी मी म्यानमारला जायचं ठरवलं. तिथे फक्त बारा तासांचा व्हिसा मिळायचा. मी खूप प्रयत्न करून आठवड्याचा व्हिसा मिळवला. मी लेखक होतो, मला लोकांना भेटायचं होतं. मग मी ठरवलं गांधीजींसारखं कायदेभंग करायचा. नियम मोडला तर कमीत कमी सरळ चार वर्षांची सक्तमजुरींची शिक्षा होती. एका ड्रायव्हरला तिप्पट पैसे देऊन त्याला तयार केलं आणि तीन आठवडे सगळीकडे फिरलो, दोन-तीन वेळा पकडला जाण्यापूर्वी अचानक सुटलो. आठवणीनं आजही अंगावर काटा येतो. सांगायचा मुद्दा हा की अशी आव्हानं स्वीकारावी लागतात.

श्रेष्ठ कवी, गीतकार मजरूह सुलतानपुरींनी नेहरूंवर टीका करणारी एक कविता लिहिली. न्यायालयात खटला सुरू झाला. न्यायाधीशांनी सल्ला दिला, माफी मागा. सुलतानपुरींनी सांगितलं, ''मी माझ्या शब्दांच्या बाजूंनी उभा राहणार. नेहरू मोठे आहेत हे मान्य आहे, पण माझे शब्दही तितकेच तोलामोलाचे आहेत.'' त्यामुळे त्यांनी दीड-पावणेदोन वर्षांची सक्तमजुरीही भोगली. शासनाविरोधात आपण लढा द्यायची भाषा जरूर करा. लढा द्या, पण शासनाला अंगावर काहीतरी कसपटे उठवेल असे शब्द प्रथम आपण शोधू या. आधी चांगलं लिहू या. नंतर शासनाला अंगावर घ्यायची भाषा करू या.

*आता आपण मुलाखतीच्या शेवटाकडे येऊयात. तुमचा वेगळा फॉर्म म्हणजे तुम्ही लिहिलेलं नाटक, 'पानिपत' कादंबरीवर तुम्ही 'रणांगण' हे नाटक लिहिलंत. कादंबरीत रणांगण पुढे आहे आणि व्यक्तिरेखा मागे. तर नाटकात हेच बरोबर उलट आहे. त्यामुळे हे उत्कृष्ट, वेगळ्या धाटणीचं नाटक झालंय. ही कादंबरी आणि त्याचं नाट्यरूपांतर ही कसरत कशी साध्य केलीत?*

मला पानिपतवर नाटक होईल, असं अजिबात वाटलं नव्हतं. १९९२ला मोहन

वाघ यांनी लता मंगेशकर यांच्या हातून ‘पानिपत’ या शब्दाची पूजा करवून घेतली. पुढची काही वर्षं मी लिहितोय, लिहितोय, अशा थापा मारत राहिलो. एक दिवस त्यांचा अमेरिकेतून फोन आला. मी नुकतंच फ्रेंच कादंबरीवर आधारित ‘ला मिझरेबल’ हे नाटक पाहिलं. ‘ही साडेचौदाशे पानांची कादंबरी तू वाचलीस का?’ हे त्यांनी विचारलं. मी ‘हो’ म्हणालो. मग या कादंबरीवर दीड दोन तासांचं नाटक होतं, तर ‘पानिपत’वर नाटक का होत नाही. मग मी मनावर घेतलं. वर्ष-दीड वर्षात अनेक खर्डे लिहिले. वामन केंद्रे यांनी दिग्दर्शन केलं. चांगले सहा-सातशे प्रयोग झाले. प्रभाकर पणशीकर, मोहन वाघ, मच्छिंद्र कांबळी, मोहन तोंडवळकर यांचा मी नाटक लिहावं, असा आग्रह असायचा. दुर्दैवानं त्या वेळी मी त्यांचं काही ऐकलं नाही, लिहिलं नाही. आता मी दोन तडाखेबंद नाटकं लिहिली आहेत. खूप उत्तम आहेत पण त्या तोडीचे निर्माते नाहीत. आजकालच्या मराठी निर्मात्यांना ‘महाभारत’ असो की ‘रामायण’, हे मोजक्या पात्रांमध्ये बसवून पाहिजे आणि फायदा मात्र ‘टायटॅनिक’सारखा हवा. या दोन गोष्टींचा मेळ जमवणं मुश्कील आहे.

*याच नाटकातील भाऊसाहेबांच्या एका संवादवाचनानं या रंगलेल्या दीर्घ मुलाखतीची आपण सांगता करू या. हा एक सुंदर विराम होईल.*

*आपल्या अनुभवातून दीर्घ पल्ल्याचं लेखन करणारे, भारतीय पातळीवर पोहोचलेले लोकप्रिय साहित्यिक विश्वास पाटील हे यंदाच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष आहेत. त्यांचं हार्दिक अभिनंदन आणि त्यांना शुभेच्छा देऊन आपण या मुलाखतीची सांगता करू या.*

*शब्दांकन : प्रसन्ना ठाकूर*

❖

तो ध्येयधुरंधर राजकारणी,
ती तमाशातली शुक्राची चांदणी,
लाल दिवा आणि घुंगरांच्या गुंतवळीची
ही रशीली कहाणी...

**चंद्रमुखी**

विश्वास पाटील



आवृत्ती दहावी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

अभिनंदन!

## नाट्यश्री साहित्य कलामंच, गडचिरोली
## राज्यस्तरीय महामृत्युंजय वाङ्मय पुरस्कार



उत्कृष्ट कथासंग्रह
पुरस्कार

**मिरॅकल**

◆

डॉ. सुनील विभुते




---



उत्कृष्ट आत्मचरित्र
पुरस्कार

**दौशाड**

◆

डॉ. नंदकुमार राऊत




---



उत्कृष्ट संशोधनपर
साहित्य पुरस्कार

**वसुंधरेचे शोधयात्री**

◆

डॉ. अनुराग लव्हेकर



# राजहंसी ग्रंथसृष्टी

## सीता

*सीतेची बौद्धिक क्षमता, वैचारिक खंडनमंडन प्रक्रियेतील सहभाग, राजकीय आणि सामाजिक विषयांवर भाष्य आणि मग तिचे अलौकिक सौंदर्य, स्वभाव, भावनिक बुद्धिमत्ता या सर्व गोष्टी रामावर आत्यंतिक प्रभाव टाकणाऱ्या होत्या. त्याशिवाय त्या दोघांमधील संवादही पुरेसा प्रगल्भ, समान पातळीवरील समंजस होता, हेही अधोरेखित होते. त्यामुळे सीता-राम यांचे सहजीवन एका वेगळ्या उंचीवर का गेले? याचाही सहज उलगडा या कादंबरीतून होतो.*

नुकतीच 'सीता' वाचून बाजूला केली. कादंबरी अतिशय वाचनीय आणि प्रवाही झाली आहे. अभिराम यांची लेखनशैली मुळात नाट्यमयरीत्या प्रसंग डोळ्यांसमोर उभी करणारी असल्याने कादंबरी वाचताना 'सीता' डोळ्यांसमोर उभी राहत जाते. रामायण कथाच मुळात काहीतरी दिव्य अलौकिक अनुभूती देणारी आहे. त्यातील कोणत्याही व्यक्ती, प्रसंगाबाबत वाचताना मनात सात्त्विक भाव आपोआपच निर्माण होतो. त्यात सीता हे तर मुख्य पात्र! जिच्याभोवती सगळं रामायण घडतं आणि जिच्यापायी हे घडतं ती सीता नेमकी कशी असेल? लोककथांनी वर्णन केलेली अबला, पीडित, दुःखी सीता इतके सगळे घडण्यास कारण कशी ठरू शकेल? असे प्रश्न नेहमीच पडत होते, त्यांची समर्पक उत्तरे 'सीता' वाचताना मिळाली. एक पूर्ण वेगळी किंवा अपेक्षित म्हणू या, सक्षम, बुद्धिमान, स्वयंसिद्धा स्त्री डोळ्यांसमोर उभी राहते. अशीच स्त्री रामायण घडवू शकते, हा विश्वास वाचकाच्या मनात निर्माण करण्यात अभिराम भडकमकर यशस्वी होतात हे कादंबरीचे पहिले आणि प्रमुख वैशिष्ट्य आहे. सीतेची बौद्धिक विवेचने वाचताना अनेक वेळा थक्क व्हायला होते. बऱ्याच गोष्टी आपल्याला अनेकदा जाणवत असतात, पण मते तयार होत नाहीत. सीता त्या अमूर्त मतांना मूर्त स्वरूप देत राहते, परखडपणे. 'दुष्टांना दुष्टपणाचा ना कंटाळा येतो, ना घृणा पण चांगल्याला चांगुलपणाचे ओझे होते' हा तिचा निष्कर्ष अनेक प्रश्नांना उत्तरे देणारा आहे.

सीतेची बौद्धिक क्षमता, वैचारिक खंडनमंडन प्रक्रियेतील सहभाग, राजकीय आणि सामाजिक विषयांवर भाष्य आणि मग तिचे अलौकिक सौंदर्य, स्वभाव, भावनिक

बुद्धिमत्ता या सर्व गोष्टी रामावर आत्यंतिक प्रभाव टाकणाऱ्या होत्या. त्याशिवाय त्या दोघांमधील संवादही पुरेसा प्रगल्भ, समान पातळीवरील समंजस होता, हेही अधोरेखित होते. त्यामुळे सीता-राम यांचे सहजीवन एका वेगळ्या उंचीवर का गेले? याचाही सहज उलगडा या कादंबरीतून होतो. कारण रामाला नुसते देवत्व देऊन सगळे प्रश्न सुटत नाहीत. त्याचे महानत्व समजून घ्यायचे तर त्याचे सहचारीसुद्धा किती प्रतिभासंपन्न होते, हे समजून घेता आले पाहिजे. त्याचे एकपत्नीव्रत समजून घ्यायचे तर त्याच्या पत्नीची सर्वगुणसंपन्नतादेखील समजून घ्यावी लागते, त्यांची परस्परपूरकता समजून घ्यावी लागते. या सर्व गोष्टींचा मानवीय पातळीवर विचार करून तो लेखकाने या कादंबरीतून प्रभावीपणे लोकांसमोर मांडला आहे.

तत्कालीन धर्म आणि संस्कृती यांबद्दलचे चिंतन वाचताना स्पष्टपणे त्याची अधोगती कशी होत गेली असावी, याचे मार्ग दिसू लागतात. विकटकीर्ती आणि छद्ममूर्ती या दोन पात्रांकरवी हे मार्ग अवलंबिले किंवा सांगितले गेले असले, तरी वैदिक काळातील साधनशुचिता नष्ट करण्यासाठी असे अनेक विचार प्रबळ ठरले असावेत, असे वाटते. 'या तत्त्वज्ञानातला मोकळेपणाच याचा घात करेल' हे वाक्य खोल अभ्यासांती आलेले आहे. 'बुद्धीचा विध्वंस करण्यासाठी वापर करणाऱ्या बुद्धिवाद्यांची कमतरता नाही या विश्वात. बुद्धिवादाचं नेमकं दुर्दैव असेल तर हेच!' या मांडणीतून सामाजिक प्रश्नांची उकलदेखील केली गेली आहे. त्यामुळे समाज कसकसा बदलत गेला आणि त्याचे परिणामस्वरूप तत्त्वे कशी बदलत गेली, याचा अंदाज येतो.

शूर्पणखेचे प्रकरण मात्र एकदा तपासून घ्यावे लागेल. वाल्मिकी रामायणात त्याचे वर्णन नेमके काय आहे, ते माहीत नाही; परंतु आजवरच्या रामायणाच्या विविध मार्गांनी झालेल्या माहितीच्या ते विसंगत वाटते. दुसरे म्हणजे कामातुर होऊन रावणाने सीतेची इच्छा धरली असती आणि कादंबरीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे उपभोगाचे तत्त्वज्ञान त्याच्या राज्यात सार्वत्रिक असते, तर त्याने सीतेचा उपभोग तिच्या इच्छा-अनिच्छेचा विचार न करता सहज आणि लगेच घेतला असता. त्याचेही स्पष्टीकरण कादंबरीत





कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या
विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...

सीता

अभिराम भडकमकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

येतेच तरीही तिथे विसंगती जाणवते आहे. तसेच सर्व युद्धनीतीचे तत्त्वज्ञान सीतेनेच सांगितले असे दाखवणे टाळायला हवे होते, असे वाटते.

मात्र युद्ध सुरू झाल्यावर सीतेला आणि वाल्मिकींना पडलेले प्रश्न शाश्वत आहेत. प्रजा, राजा, युद्ध यांविषयीचे विचार कालातीत आहेत. 'जोवर राजा विजयश्री खेचून आणतो तोवर प्रजा त्याच्यासाठी पायघड्या घालते. अन्यथा तीच प्रजा त्याचा अनादर करते.' हे वाक्य डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारे आहे. महत्त्वाचे म्हणजे वाल्मिकींची लेखनप्रक्रियेतली तगमग अगदी तंतोतंत कुठल्याही कादंबरी लेखकाची होईल, अशीच वास्तवपूर्ण मांडली आहे. मध्येमध्ये लेखनाबद्दल आणि लेखनप्रक्रियेत वाढत चाललेल्या गुंत्याबद्दलचे त्यांचे विचार स्वाभाविकपणे आलेले आहेत. शेवटचा तीन-चार पानांचा उपसंहार मूळ रामायणावर झालेल्या विविध संस्करणांचा थोडक्यात लेखाजोखा आहे. एकूणच मूळ स्वरूपातील तत्त्वे समजून घेण्याचा आणि देण्याचा प्रयत्न लेखकाने 'सीता'च्या निमित्ताने साध्य केलेला आहे. त्यामुळे मूळ वाल्मिकी रामायणातील 'सीतातत्त्व' समजून घेण्यासाठी ही कादंबरी नक्की वाचली पाहिजे.

***विद्या पोळ - जगताप***
९०११२६७८६३

---

## ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

*हिमालयावर आपले लेखक किंवा कवी फारसं लिहीत नाहीत, असं मला वाटायचं.*
*त्याचं कारण कदाचित त्यांनी हिमालयाची वाट कधीच धरली नसावी.*
*लेखिका असून ट्रेकरही असणं, हिमालय अनुभवण्यासाठी तेवढे कष्ट घेण्याची*
*तयारी असणं, असं मृणालिनी चितळे हे एक अजब रसायन असल्यामुळेच*
*तिला ते जमलं आणि या पुस्तकाच्या रूपानं सुंदर साहित्यकृती आली!*
*जाणून घेऊ या कादंबरीविषयी...*

या पुस्तकातले तपशील इतके अचूक आहेत, की मृणालिनीनं स्वत: एव्हरेस्ट चढाई केल्यासारखं लिहिलं आहे. हिमालय बोलावतो, पुन्हापुन्हा बोलावतो हेच खरं.

पुस्तकातली मुख्य व्यक्तिरेखा विली. ॲडोलेसंट मुलगा ते एक बाप हा त्याचा प्रवास खूप छान गुंफला आहे. त्याच्या विचारांची आंदोलनं, नंतर त्याला मिळालेली केझियाची साथ, त्याचं आई-वडिलांशी, आत्याशी असलेलं नातं खूप छान रंगवलं

आहे. अनेकदा ‘ओल्ड मॅन अँड द सी’ किंवा ‘हक्कलबरी फिन’मधला मुलगा आठवतो! संवादातून माणसांची व्यक्तिरेखा उभी करणं हा तिचा हातखंडा आहे. शिवाय आजूबाजूचे बारकावे टिपण्याची नजर आहे, ती वातावरणनिर्मितीसाठी अतिशय प्रभावी झाली आहे. काठमांडूचं वर्णन एका परिच्छेदामध्ये मांडणं, हे अवघड काम तिनं उत्तम केलं आहे. तसंच खुंबू व्हॅलीमधलं हिलरीचं काम एका परिच्छेदामध्ये बसवणंही. ट्रेक करत असतानाची ट्रेकरची मन:स्थिती, मनातले विचार, विचारांची आंदोलनं, भावना अनावर होणं, आपल्याला आपण गवसणं इत्यादी गोष्टी तिनं चपखलपणे लिहिल्या आहेत. या सगळ्या गोष्टींचा अनुभव तिनं घेतला असल्यामुळे तमाम गिर्यारोहकांना हे पुस्तक अतिशय आपलं वाटेल. कुणी गिर्यारोहण करत नसले, तरीसुद्धा या वातावरणातल्या अनवट वाटांमधून एखाद्या घरबैठ्या व्यक्तीला एव्हरेस्टची सफर घडवल्याचं पुण्य तिला लाभेल! ‘रारंगढांग’सारखं पुस्तक वाचकांनी जसं डोक्यावर घेतलं, तसंच हेही पुस्तक लोकांना अतिशय आवडेल. तिचा पर्यटनाचा आवाका, सूक्ष्म निरीक्षण, उत्तम स्मरणशक्ती आणि ठिपके जोडण्याची कला हे सगळं एकत्र आल्यामुळे ही कादंबरी वाचकाला एका वेगळ्याच विश्वात घेऊन जाते आणि खूप छान अनुभव देते. वाचताना हे काही मुद्दाम केलं आहे म्हणजे ही कलाकृती करायची म्हणून केली आहे, असं वाटत नाही. सगळं काही सहज घडत जातं. त्या गोष्टीसाठी तिचं कौतुक.

या कादंबरीतून तिनं तिची प्रतिभा पुन्हा सिद्ध केली आहे. आता या कादंबरीतल्या काही जागा जिथे मृणालिनी डोकावते. उदाहरणार्थ, विली पहिल्यांदा ट्रेकला जातो आणि आभाळाखाली झोपतो, तेव्हा त्याला समुद्र पांघरून झोपल्यासारखं वाटतं. उलटा समुद्र असं तिनं म्हटलंय! पक्ष्याचं रूपक, पर्वत सोसणं ही संज्ञा. आय बिलाँग टू हिमालय! अशी विलीची धारणा तयार होणं! दुसरं विलीच्या सर्व फोटोंमध्ये केझिया होती. शुभ्रधवल विली आणि रेताड केझिया... गवतावरचा प्रसंग... केझियाची कविता नि पक्ष्याचं रूपक... पर्वत सोसणं ही संज्ञा असं बोलणं श्रीमत माणसांना जमत असावं.

इतिहास, राजकारण, कायदा, समाज, समाजातल्या प्रथा या सगळ्यांचा अभ्यास आणि परिपाक तिच्या लेखनाच्या आगेमागे वातावरणनिर्मितीत दिसतो. डॅनियलचे भास तर अद्‌भुत लिखाण आहे! पात्रांची स्वगतं ही तिच्या लेखनाची खास शैली आणि शक्ती आहे! शेवटी गोरक पक्ष्याचं नाव विलीच्या मुलाला देऊन कथेतले अनेक बिंदू जुळवून वाचकांना हलकासा आनंद दिला आहे. तेही तिच्या शैलीत! शेवट आपल्या घरातलाच प्रसंग वाटतो! तो समोर ठेवून सगळ्या उलटसुलट विचारांना पूर्णविराम दिला आहे! मुक्ती दिली आहे. कथानकात एक छान सिनेमा होण्याइतकी ताकद आहे.

***डॉ. ज्योत्स्ना पडळकर***
९०४९२३१२७३

# असे जन्मले पुस्तक

## सावलीचे गाणे

*कविता म्हणजे आत्म्याचा स्वर*

- विद्या पोळ - जगताप

कवितालेखन हा माझा प्रांत आहे किंवा नाही ते मला माहीत नाही आणि मला त्या चिकित्सेत पडायचेही नाही. माझी कविता म्हणजे निव्वळ माझ्या आत्म्याचा स्वर आहे आणि कवितेपुरते मला तेवढेच पुरेसे आहे. माझी कविता काव्यशास्त्राच्या कसोट्यांवर कदाचित कमी पडू शकेल, परंतु तिचा सच्चेपणा कुठेही कमी पडणार नाही. कविता ही एक स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण व्यवस्था आहे. ती कुठून कशी येते, काय शब्दकळा घेऊन येते; हे खुद्द कवीलाही निश्चितपणे सांगता येणार नाही. बरेचदा समोर आलेला प्रसंग, अनुभव, घटना या तितक्या टोकदार असतील च असे नाही. सर्वच अनुभव तितकेच प्रखर असतील असे नाही, तरीही काही कविता मात्र एकदम धारदार होऊन येतात. कधी कधी तर मी अशाही वेळा पाहिल्या आहेत की दिवसच्या दिवस, काही आठवडे सतत मनावर गच्च झाकोळ राहतो, पाण्यातल्या भोवऱ्यात अडकून जीव गुदमरावा तसा श्वास कोंडलेला राहतो, अस्वस्थ तगमग होत असते आणि एका अनपेक्षित क्षणी अगदी अशक्य आनंद कवितेतून पाझरू लागतो. त्यामुळे अमूक एका प्रसंगात ही कविता सुचली, हे जर अगदी खरे खरे सांगितले तर वाचकांना चक्क हसू येऊ शकते.




*इथला पाऊस*
*इथले वारे*
*धडाडणारे आभाळ सारे*
*सोबत मला न्यायचे आहे*

या ओळी मला सातारा सोडायची वेळ झाली, तेव्हा सुचल्या होत्या. या पूर्ण कवितेत जे वर्णन आहे ते माझ्या साताऱ्यावरील निस्सीम प्रेमातून आलेले आहे. पण ती कविता तुम्ही वाचताना तुमचे संदर्भ अगदी भिन्न असू

शकतील. त्यामुळे तुम्ही कवितासंग्रह वाचून नक्की हा पडताळा घ्यावा आणि मलाही आपापल्या अनुभवाबद्दल जरूर कळवावे, असे आवर्जून सांगेन.

*विरून जा तू विरून जा*
*अज्ञातातच विरून जा*

या ओळी सुचल्या तेव्हा अजिंक्यताऱ्याच्या कड्याच्या टोकावर फुलांनी पूर्ण बहरलेला देवचाफा समोर होता. एका अर्थी आपण प्रत्यक्ष घेत असलेला अनुभव आणि त्या वेळी सुचलेली कविता यांचा परस्पर थेट संबंध लावणे अगदीच चुकीचे ठरते. कविता ही अनेक जन्मांचे काहीतरी संचित असावे, असे मला वाटते. मुळात कुठलेही लेखन हे नुसत्या अनुभवातून येत नाही, तसेच ते पूर्णपणे काल्पनिक अधांतरीही नसते. आपल्याकडून कविता घडत नाही तर कविता आपल्याला घडवत असते, हा निदान माझा तरी प्रांजळ अनुभव आहे. आता मी या विषयावर कविता लिहिणारच असे ठरवून जशी कविता लिहिता येत नाही, तसेच नाहीच लिहीत आता असे म्हणत तिच्यापासून दूर पळताही येत नाही; म्हणून खरे तर मी कविता लिहिते. त्यामुळे या संग्रहातील प्रत्येक कविता एक वेगळी अनुभूती आहे. सभोवताली घडणाऱ्या अनेक घटनांच्या परिणामांचा समुच्चय कवितेच्या रूपाने उतरत असतो.

*तू आलासच अशा वळणावर*
*जिथून वैकुंठपालखी निघत होती*

या प्रकारची रचना म्हणजे अनेक भ्रम-विभ्रमांचा लेखाजोखा असू शकतो. अशाच प्रकारे माझ्या कवितेत सातत्याने आणि वेगवेगळ्या रूपाने येणारा निसर्ग हा माझ्या जगण्याचा आधार, पाया असल्याने कवितेत अटळपणे येतो, हे मला अनेकदा जाणवते. ऊन, वारा, पाऊस, आभाळ हे सर्व वेळी सर्वच प्रकारच्या लेखनात उतरत राहणारे घटक आहेतच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा घटक म्हणजे 'झाड'. झाडांशी माझा जन्मोजन्मीचा ऋणानुबंध कवितेनेच मला वेगवेगळ्या प्रकारे दाखवून दिला आहे. तोच कधी -

*एकेक कविता*
*सुचत जावी*
*फांदीफांदीतून*
*पानापानातून*

असे लिहायला प्रवृत्त करतो आणि शेवटी -

*भय अवघे संपेल*
*आणि होईल जगणे*
*एक आनंदाचे झाड*
*एक सावलीचे गाणे*

असा आशावादही मनात रुजवत ठेवतो. ‘सावलीचे गाणे’मध्ये अनेक प्रकारच्या भावनांचे कवडसे उमटलेले आहेत, हे मुखपृष्ठ पाहताच लक्षात येईल. अन्वर हुसेन या प्रतिभावान चित्रकाराने मुखपृष्ठातून त्याचे विविधरंगी स्वरूप अतिशय तरलपणे चितारले आहे. कवितासंग्रह वाचताना तुम्हाला कधी ‘वाच गं घुमा’ भेटेल तर कधी ‘उशीरा सुचलेली कविता’ भेटेल. ‘कवी आणि व्यवहार’, ‘करार’मधली निराशा दिसेल तशीच ‘पुन्हा एकदा’, ‘एक दिवस’सारखा आशावादही आहे. कधी ‘खात्री’सारखी कविता आपल्याच सुप्त अपेक्षांचे मूर्त रूप आपल्याच समोर उभे करू शकते. म्हणूनच कवीबद्दल बोलताना,

*इहलोकातील नाही*
*त्याचे जागणे निजणे*
*लक्ष योनींच्या फेऱ्याशी*
*जन्म बांधून थिजणे*

असेही माझी कविता म्हणू शकते. ‘बाय गं’ कादंबरी लिहिताना अनेकदा पात्रांवर, त्यांच्या आयुष्यावर जे काही विचारमंथन चालू होते, त्यातून ‘पांचाली’, ‘का गं राणी’सारख्या स्त्रीवादी कविता कागदावर आपसूक उतरल्या. स्त्रियांच्या अनेक प्रश्नांबाबत विचार करताना, त्या प्रश्नांचे त्यांचे आकलन आणि त्यानुसार येणाऱ्या प्रतिसादांकडे तटस्थपणे बघताना ‘एक चिमणी जरा भिजली आडोशाला धावू आली’पासून ‘एक चिमणी झेपावली सारा पाऊस पिऊ गेली’पर्यंतचा आपला प्रवास यातनामय असला तरी सहज होऊन जातो. कधी कधी कविता एकदम सोपी होऊन


वर्गीस कुरियन या माणसानं अट्टाहासानं
कोट्यधीश होण्याचा मार्ग नाकारला.
‘आणंद’सारख्या धूळभरल्या खेड्याला आपली कर्मभूमी मानून
विदेशी आक्रमणाला थोपवत ‘अमूल’ची
निर्मिती केली. ‘धवलक्रांती’च्या जनकाचा हा
विलक्षण प्रवास! रंजक, उद्‌बोधक
आणि भारतीय मानसिकतेवर
जळजळीत प्रकाश टाकणाराही!



माझंही एक स्वप्न होतं (आत्मचरित्र)

वर्गीस कुरियन । अनुवाद : सुजाता देशमुख

आवृत्ती दहावी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

येते आणि कधी प्रचंड घालमेलीतून काहीतरी उमलावं तशी उमलते. पण एक मात्र नक्की, की ती आपले जगणे सोपे करून जाते आणि मग कधी कधी हात जोडून सहज मागून जाते.

*साध्या कृतींना अर्थ दे*
*साऱ्या श्रुतींचे मर्म दे*
*हो पुर्तता सहजी जयांची*
*इच्छा ही मम साध्याच दे*



माझ्या या अशा सहजसोप्या मागण्यांना, अनुभवाच्या बिल्लोरी कवडशांना संग्रहाचे रूप देऊन वाचकांपर्यंत पोहचवण्याचा सगळा खटाटोप करणारा राजहंस परिवार, डॉ सदानंद बोरसे आणि दिलीप माजगावकर या सगळ्यांच्या मन:पूर्वक शुभेच्छांचा आविष्कार म्हणजे 'सावलीचे गाणे' एवढेच तूर्त म्हणेन.

***विद्या पोळ - जगताप***
९०११२६७८६३

हा आहे एका संवेदनशील कवयित्रीचा
आत्मिक स्वर! तिच्या अनुभवांतून उमटलेला.
वाचकांना येथे गवसेल
निसर्गघटनांचं संवेदनचित्र आणि
मानवी भावभावनांचे कवडसे.
हे कवडसे ओंजळीत झेलणं म्हणजे आनंद.
तेव्हा जरूर वाचा...



सावलीचे गाणे

विद्या पोळ - जगताप

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# आठवणींचा पारिजात

## जीवेत् शरदः शतम्

*सुप्रसिद्ध निवेदक आणि मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांचा २५ नोव्हेंबर रोजी अमृत महोत्सव साजरा झाला. त्या निमित्ताने त्यांचे सुहृद श्रीराम रानडे यांनी जागवलेली ही एक आठवण...*

शनिवारचा दिवस. सकाळची शाळा. शेवटचा तास. काही वेळातच घंटा होणार आणि शाळा सुटणार. तेवढ्यात शाळेचे सेवक खामकर एका गृहस्थाला घेऊन माझ्याकडे आले. पायांत जुनाट वहाणा. मळकट धोतर, मळकट शर्ट आणि मळकट कोट. डोक्यावर तपकिरी रंगाची टोपी. गळ्याभोवती मफलर गुंडाळलेला. डोळ्यांवर चष्मा, हातात काठी आणि चेहरा... बाप रे! भयंकर. सर्व चेहऱ्यावर वांगाचे डाग - असं एकूण स्वरूप.

"हे बघा कोण तुम्हाला भेटायला आले आहेत. यांना बोलता येत नाही. पण रानडे सरांना भेटायचंय, असं एका कागदावर लिहून सांगितलं." खामकरांनी त्या माणसाला माझ्याकडे सोपवलं आणि ते आपल्या कामाला निघून गेले. 'कोण हा कळकट मनुष्य... याची-माझी ना ओळख, ना पाळख.' असं माझ्या मनात प्रश्नांचं मोहोळ उठत असतानाच त्या गृहस्थानं कोटाच्या खिशातून एक चिठ्ठी काढून माझ्या हातात ठेवली. मी ती चिठ्ठी उघडली आणि वाचू लागलो -

*राम रानडे*
*सदरचे गृहस्थ मुके आहेत. पण उत्तम ज्योतिषी आहेत. हाताच्या स्पर्शावरून ते ज्योतिष जाणतात आणि कागदावर लिहितात. अवश्य प्रचिती घ्यावी.*

*श्री. भा. महाबळ*

अरे वा! श्री. भा. महाबळ म्हणजे माझे चुलतमामा. 'मनोहर'चे संपादक. आम्ही मुकुंदनगरला अहिरेश्वर वाडीत शेजारी-शेजारीच राहायचो. जवळच असलेल्या 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर'च्या ऑफिसात मी वारंवार जायचो. त्यामुळे तिथल्या संपादकीय विभागातल्या सर्व व्यक्ती माझ्या चांगल्याच परिचयाच्या. महाबळांचीच चिठ्ठी असल्यामुळे त्या 'गचाळ' व्यक्तीकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन साफ बदलला.

त्या व्यक्तीला (आता माणसाला नाही) घेऊन मी मुख्याध्यापक पु. ग. उर्फ भैय्या वैद्यांच्या ऑफिसमध्ये गेलो. ऑफिस कसलं... १० बाय ६ची टपरी, एक

टेबल, एक खुर्ची आणि आल्या-गेलेल्याला बसण्यासाठी एसटीची दोन बाकडी. डुगडुगणारी. त्या गृहस्थांना मी एका बाकड्यावर बसवलं. काही क्षणांतच त्यांनी माझा तळहात आपल्या हाती घेतला आणि हात चाचपडत चाचपडत कागदावर माझं भविष्य लिहायला सुरुवात केली. - *पत्नीचं नाव संजीवनी. काही महिन्यांपूर्वीच तुमचा विवाह झाला आहे. तुम्हाला  नाटक-सिनेमाची आवड आहे. त्यात तुम्ही भूमिकाही करता, पण अजून तुम्हाला मनाजोगती एकही भूमिका मिळालेली नाही. सायन्स साइड सोडून तुम्ही आर्ट साइड निवडलीत. तुम्ही आज जरी पुण्यात असलात, तरी तुम्ही सांगली-मिरजेकडचे आहात.*

मोत्यांची सर ओघळावी, तशी माझी कुंडली - माझं भविष्य ते कागदावर उतरवत होते आणि सारं एकशे एक टक्के खरं!

मी अवाक् होऊन त्या गृहस्थाकडे (आता सद्गृहस्थाकडे) पाहू लागलो. मुखावर वांगाचे डाग, पण डोळे अत्यंत बोलके. असं माझ्याविषयीचं भविष्यकथन सुरू असतानाच मुख्याध्यापक वैद्य आले. त्यांनीही कुतूहलानं आपला हात पुढे केला. त्यांनाही या ज्योतिषी महाराजांनी हस्तस्पर्श करून भविष्य सांगितलं.

कर्णोपकर्णी वार्ता शाळेच्या स्टाफमध्ये पसरली. बाहेर शिक्षकांची रांग लागली आणि ज्योतिषी महाराजांच्या चेहऱ्यावर घाम दाटू लागला. त्या १० बाय ६च्या ऑफिसमध्ये त्यांना प्रचंड उकडू लागलं. त्यांनी डोक्याची टोपी काढली, गळ्यातला मफलर बाजूला केला आणि आणि एका क्षणी चेहऱ्यावर वांगाचे डाग असलेला 'चेहरा'ही उतरवला. आम्ही अवाक् होऊन बघतच राहिलो. तो आमचा मित्र सुधीर गाडगीळ – हो, हो! प्रत्यक्ष सुधीर गाडगीळ होता.

''अरे रामभाऊ, इथं उकडून उकडून हैराण झालो, नाही तर अजून बराच वेळ तुझं भविष्य लिहिलं असतं.''

महाबळांकडून माझी इत्थंभूत माहिती घेऊन ते इथवर पोहोचले होते. ''मानलं! मानलं सुधीर तुला.'' आम्ही सर्वांनी त्याच्या या सोंगाला दाद दिली. मग गप्पाटप्पा, हास्यविनोद. आजवर कुणाकुणाचा हात बघितला आणि त्यांना दाखवला याविषयी रसाळ माहिती. कोणी कशी दिलखुलास दाद दिली आणि कुणी कसा अबोला धरला याविषयी अनुभवकथन.

सुधीरची आणि माझी झालेली पहिली भेट आजही मला स्पष्टपणे आठवते आहे. मी राष्ट्र सेवा दल कलापथकात निळूभाऊ फुले यांच्यासमवेत काम करत होतो. सेवा दलाची कचेरी आप्पा बळवंत चौकातल्या नू. म. वि. प्राथमिक शाळेच्या इमारतीशेजारी एका दुमजली जुनाट घरातल्या दुसऱ्या मजल्यावर होती. वर जायला अरुंद जिना होता. डाव्या हाताला प्रभाकर जनार्दन साने यांचं बिऱ्हाड आणि उजव्या हाताला सेवा दल कचेरी. त्या ठिकाणीच निळूभाऊ आमच्या लोकनाट्याच्या तालमी घ्यायचे. 'बिनबियांचं झाड', 'कुणाचा कुणाला मेळ नाही' ही वगनाट्यं, लोकनृत्यं,

लोकगीतं, असा हा सर्व लोककलांचा सराव तिथे चालायचा.

एके दिवशी दोन पोरसवदा कॉलेजमध्ये शिकणारे दोघे पत्ता हुडकत हुडकत त्या ठिकाणी आले. एक थोडासा जाडसर आणि दुसरा शेलाटा. जाडसर मुलानं आपलं नाव सांगितलं, ''मी अनिल महाजन.'' शेलाट्या पोरानं नाव सांगितलं, ''मी सुधीर गाडगीळ. आम्ही बी.एम.सी.सी.चे विद्यार्थी. आम्ही 'पुढारी पाहिजे' हे पु. ल. देशपांडे यांचं वगनाट्य कॉलेजसाठी बसवतो आहोत. आपण डायरेक्शन करायला याल का?'' हे सुधीर गाडगीळचं पहिलं दर्शन! बोलणं काहीच नाही. पुढील काळात अनिल आणि सुधीर माझे मित्र झाले आणि मी 'मोरूची मावशी', 'मृगया', 'नाथ हा माझा', 'फिल्म स्टुडिओ मुंबई' इत्यादी नाटकांतून बरोबरीनं कामही केली. सुधीर पत्रकारितेत शिरला. 'मनोहर'मध्ये लिहू लागला, पण 'मनोहर'च्या ऑफिसमध्ये मला तो कधीच दिसला नाही. पायाला भिंगरी लावून तो अनेकांच्या मुलाखती घेण्यासाठी फिरू लागला. मुंबई दूरदर्शनच्या अनेक कार्यक्रमांत तो झळकू लागला. स्वतंत्र स्तंभलेखन करू लागला, व्यक्तिचित्र रंगवू लागला. मोठ्या व्यक्तींच्या मुलाखती घेऊ लागला आणि 'वेलू गेला गगनावेरी' अशी कीर्ती त्यानं मिळवली.

दिलीप माजगावकर, दिलीप प्रभावळकर, लोकसत्ता-केसरीचे माजी संपादक आणि प्रसिद्ध लेखक अरविंद गोखले, शेखर ढवळीकर, मी आणि सुधीर गाडगीळ असा आमचा एक छानसा मित्रमेळावा जमला आहे. अधूनमधून भेटतो. गप्पाटप्पा, टिंगलटवाळी, हास्यविनोद यांत रंगून जातो.

बघता बघता सुधीर अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. मित्रा, तुझ्या कारकिर्दीला सलाम आणि पुढील जीवनासाठी केवळ वयाचा आधार घेऊन शुभाशीर्वाद.

जीवेत शरदः शतम्. स्नेह आहेच, वृद्धिंगत व्हावा.

***श्रीराम रानडे***, ९८८११२२५८८


अभिनंदन! कै. विकास पाटील सामाजिक प्रतिष्ठान, कणेगाव



कै. विकास पाटील स्मृती
साहित्य राज्यस्तरीय पुरस्कार

**गोंदणखुणा** (ललित गद्य)

डॉ. प्रिया निघोजकर



## ‘राजहंसी’ विविधा




बालरंगभूमी, प्रायोगिक रंगभूमी, व्यावसायिक रंगभूमी या सर्व क्षेत्रांत लीलया वावरणाऱ्या रत्नाकर मतकरी यांचे अनुभवकथन. रंगभूमीच्या वाढीसाठी अपरिहार्यपणे कराव्याशा वाटलेल्या प्रयोगांचे हे तपशीलवार सत्यकथन लेखकाच्या ओघवत्या नाट्यपूर्ण शैलीमुळे एखाद्या कादंबरीसारखे वाचनीय झाले आहे...

### माझे रंगप्रयोग

रत्नाकर मतकरी

किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)

गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच ‘दिगमा’ या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...



### पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर



दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...

### वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट. ख. ₹ १००)

# क... कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## खिडकी

उजेडानं आलं भान
खुणावती दूर रान
खिडकीनं दिलं बाई
ऊन पावसाचं दान

सुगंधाची पडे भुल
मोगऱ्याचे धुंद फूल
डोकावते खिडकीत
चमेलीची उंच वेल

माहेराची येता सय
मन खेळतं गं झिम्मा
बाळ माझा हासतो गं
पाहुनीया चांदोमामा

गुज सखीला बोलते
पैस जीवाला मिळते
खिडकीच्या कठड्याला
माझी वेदना कळते

उरी दाटते काहूर
वाहे आसवांचा पूर
खिडकीला ऐकू येई
माझ्या भैरवीचा सूर

**उमा व्यास**

## 'राजहंसी' विविधा



'भूखंड घोटाळ्या'पासून 'दाऊद'शी संबंधापर्यंत,
'एन्रॉन'पासून 'लवासा'पर्यंत आपल्याबद्दलच्या विवादांना
अन् प्रवादांना थेट भिडणारी राजकीय आत्मकथा.

### लोक माझे सांगाती...

राजकीय आत्मकथा

शरद पवार

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ६५०/- । (ट.ख. ₹ ५०)

एकापाठोपाठ एक महत्त्वपूर्ण धरणांची उभारणी करणाऱ्या
एका कुशल इंजिनीयरच्या नजरेतून धरणप्रकल्पाशी नाळ
जोडलेल्या एका आगळ्यावेगळ्या जगाचा अन्
संस्कृतीचा वेध घेणारी अनोखी कादंबरी.

### धरणसूक्त

विलास शेळके

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)



**अभिनंदन!**

### निर्मला मठपती फाउंडेशन, सोलापूर



राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट
साहित्यनिर्मिती पुरस्कार -
कविता विभाग - विशेष
उल्लेखनीय पुरस्कार

**अजान आणि चालिसा**

◆

मुबारक शेख



# उद्गार

## नियतकालिकांचे / समाजमाध्यमांचे अभिप्राय

### कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या!

*चित्रकार सुहास बहुळकर यांच्या ‘कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या!’ या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित विविध कलाकृती व शिल्पाकृतींची तपशीलवार माहिती देण्यात आली आहे.*

प्रख्यात इतिहास संशोधक वा. सी. बेंद्रे यांनी छत्रपती शिवरायांचे अस्सल चित्र प्रथम शोधून काढले. त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र म्हणून वेगळेच चित्र प्रसिद्ध होत होते. बेंद्रे यांनी कॉलिन मेकॅन्झी यांनी प्रसिद्ध केलेल्या खंडातून महाराजांचे चित्र शोधून काढले आणि ते अस्सल चित्र असल्याचे पुराव्यानिशी सिद्ध केले.

स्वत: चित्रकार असलेल्या सुहास बहुळकर यांनी महाराजांची चित्रे कोणी, केव्हा, कशी आणि किती अडचणीत काढली याची तपशीलवार माहिती गोळा केली आहे. फक्त चित्रांची माहिती न देता शिवाजी महाराजांचे मंदिर, तसेच त्यांची विविध शिल्पे आणि पुतळे यांबद्दलही माहिती पुस्तकात देण्यात आली आहे. कोल्हापूरचे चित्रकार आबालाल रेहमान, तसेच राजा रवी वर्मा, दीनानाथ दलाल यांच्यापासून ते शिल्पकार विनायक करमरकर यांच्या कलेचे, परिश्रमाचे महत्त्व या पुस्तकातून पुन्हा एकदा अधोरेखित होते.

छत्रपती शिवरायांच्या चित्रांची माहिती घेण्यासाठी बहुळकरांना बरेच प्रयत्न करावे लागले. त्यांना नागपूरचे ज्येष्ठ इतिहास संशोधक विजयराव देशमुख यांनी लिहिलेल्या ‘शककर्ते शिवराय’ या पुस्तकातूनही काही माहिती मिळाली. पिंपरी-चिंचवडमधील ‘भक्ती-शक्ती’ शिल्प किंवा सिंधुदुर्गमधील महाराजांचे मंदिर असो, या ठिकाणांचे नुसते प्रवासवर्णन कुठेही वाचायला मिळेल, पण त्यापलीकडची माहिती बहुळकर यांनी दिली आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भक्ती-शक्ती शिल्प उभारतानाचा तपशील आणि शिल्प तयार करणाऱ्या गर्गे दांपत्याचा कलाभ्यास, परिश्रम लेखकाने विस्ताराने मांडले आहेत. गर्गे यांना शिल्प उभे करण्याची दृष्टी त्यांच्या वडिलांकडून कशी मिळाली, हेही यातून कळते.

प्रत्येक चित्राचा तपशील वाचल्यानंतर बहुळकरांनी या चित्रांचा पाठपुरावा किती चिकाटीने केला, ते लक्षात येते. छत्रपती शिवरायांच्या शिल्पांच्या उभारणीसाठी, तसेच रायगडावरील त्यांच्या समाधीसाठी जनतेचे सहकार्य कसे लाभले, हेही बहुळकरांनी सविस्तर सांगितले आहे. शिवरायांवरील चित्र आणि शिल्प ज्या पद्धतीने तयार झाले, त्याचा वृत्तान्त वाचताना हा साराच प्रवास किती विलक्षण आहे याचा अनुभव येतो.

छत्रपती शिवरायांच्या पहिल्या चित्राच्या कथेपासून ते जर्मनीमध्ये त्यांच्यावर काढण्यात आलेले नाणे, त्यासाठी भारतीय मुलीने केलेले रेखांकन आणि यासंबंधीची स्पर्धा याचीही माहिती पुस्तकात मिळते. बहुळकर यांनी या विषयाचा ध्यास घेऊन दहा वर्षे काम केले, त्यातून हा ग्रंथ सिद्ध झाला! पुस्तकाचे संपादक आनंद हर्डीकर यांनीदेखील यातील माहिती अचूक आणि वस्तुनिष्ठ कशी असेल, याची खबरदारी घेतल्याचे जाणवते. या दोघांचे मनोगत वाचल्यानंतर पुस्तकासाठी घेण्यात आलेले श्रम तर कळतातच; पण पुस्तकाचा हेतू आणि शिवकार्यामध्ये झोकून देऊन काम करणारे लोक किती निष्ठेने काम करतात, याचा प्रत्ययही येतो. करमरकर यांनी शिल्प साकारण्यासाठी केलेले प्रयोग असोत किंवा चित्रकार देऊसकर यांची शैली असो, प्रत्येक प्रकरण एक वेगळीच लढाई आणि त्यातील यश हा वेगळाच आनंद!

बहुळकर येथे लेखणीच्या साहाय्याने हा सारा प्रवास एखाद्या रोमहर्षक मालिकेसारखा सादर करतात. यातील प्रत्येक कहाणीत सत्यता आहेच, पण प्रत्येक प्रकरणातील कथानायकाची असीम गुणवत्ता, विविध योगायोग आणि लोकांचा सहभाग हे सर्व जुळून आले की काय घडते, याचे प्रत्यंतर आपल्याला येते. थोडक्यात काय




देशविदेशातील असंख्य कलाकारांनी आपापल्या कलांतून
छत्रपती शिवाजी महाराज घडवले. त्या कलाविष्कारांमागील
संघर्षकथाही तितक्याच लक्षणीय. अशा असंख्य कथांचे
आणि तशाच व्यथांचे हे अनोखे संकलन
म्हणजे इतिहास, चित्रकला आणि शिल्पकला
या तिन्ही क्षेत्रांतील असंख्य मान्यवरांच्या
अतुल कार्यकर्तृत्वाला दिलेली मानवंदनाच आहे!

**कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या**

सुहास बहुळकर

किंमत : ₹ १०००/- । सवलतीत : ₹७५० । (ट.ख. ₹ ८०)

तर, बहुळकरांना एक महापट त्यातील मानवी कुशलतेच्या आणि समाजजीवनामध्ये उमटणाऱ्या घटनांचा समन्वय साधत उलगडण्यात यश आले आहे, यात शंका नाही!

***मंगेश वरवडे***

*(सकाळ, १४ नोव्हेंबर २०२५मधून साभार)*

---

## नृत्यमय जग... नर्तनाचा धर्म...

*'राजहंस' प्रकाशित 'नृत्यमय जग.. नर्तनाचा धर्म' हे पुस्तक म्हणजे ज्येष्ठ कथक नृत्यांगना शमा भाटे यांचे आत्मचरित्र आहेच; पण त्याचबरोबर गेल्या ७५ वर्षांत कथक नृत्य महाराष्ट्रात कसे रुजत गेले, याचा इतिहास व नर्तकांना कोणत्या समस्या भेडसावतात याचे स्पष्ट चित्र या पुस्तकात आहे.*

शास्त्रीय नृत्यशैली या सामान्य जनतेपासून बऱ्याचदा अंतर राखून असतात. या संबंधीची काही पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत; पण ती बहुतांशी नृत्य शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहेत. काही वर्षांपूर्वी ज्येष्ठ गुरू आणि नृत्यांगना रोहिणी भाटे यांचे 'लहेजा' हे एक दर्जेदार पुस्तक 'पॉप्युलर प्रकाशन'ने बाजारात आणले होते. आता 'राजहंस प्रकाशन'ने ज्येष्ठ कथक नृत्यांगना शमा भाटे यांचे 'नृत्यमय जग.. नर्तनाचा धर्म' हे पुस्तक प्रकाशित केले आहे. हे पुस्तक म्हणजे शमा भाटे यांचे आत्मचरित्र आहेच; पण त्याचबरोबर गेल्या ७५ वर्षांत कथक नृत्य महाराष्ट्रात कसे रुजत गेले,


नृत्य हाच श्वास... नृत्य हाच प्राण...
तोच मार्ग आणि तेच गंतव्य असणाऱ्या
कथक नृत्यांगना शमा भाटे यांच्या नृत्यमय
जीवनाची गाथा! या कलासंपन्न विदुषीचा
हा 'नाद-रूप' प्रवास म्हणजे
गेल्या पाच दशकांतील सांस्कृतिक स्पंदनेच...!



**नृत्यमय जग... नर्तनाचा धर्म...**

शमा भाटे

किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

याचा इतिहास व नर्तकांना कोणत्या समस्या भेडसावतात याचे स्पष्ट चित्र या पुस्तकात आहे.

महाराष्ट्राची स्वत:ची अशी कोणतीही शास्त्रीय नृत्यशैली नाही. ७५ वर्षांपूर्वी, म्हणजे ज्या काळात समाजात नृत्याला प्रतिष्ठा नव्हती, पालक आपल्या मुलींना नृत्य शिकू देत नव्हते, त्या काळात स्वत: रोहिणीताईंनी म्हणजे शमा भाटे यांच्या गुरूंनी अडचणींतून मार्ग काढत नृत्याचा कसा प्रसार केला, याचे वर्णन या पुस्तकात आहे. स्वत: रोहिणीताईंनी नृत्य शिकण्यासाठी किती मेहनत घेतली, त्या वेळी नृत्याच्या शिक्षणाचे आणि रियाजाचे स्वरूप कसे होते, स्वत: शिक्षण घेताघेता त्यांनी विद्यार्थिनी कशा घडवल्या, वेळोवेळी आपल्या गुरूंसमोर ती प्रगती कशा दाखवत होत्या; हा सगळा प्रवास वाचताना पुस्तक वाचकाला खिळवून ठेवते. या संदर्भात गेल्या ७५ वर्षांत झालेले बदल या पुस्तकात शमा भाटे यांनी चित्रित केले आहेत. या काळातील सर्व प्रथितयश नर्तकांच्या नृत्याचे साक्षेपी समीक्षण या पुस्तकात करण्यात आले आहे. १९५० ते २०२५ या ७५ वर्षांत नृत्याच्या क्षेत्राबरोबरच समांतर रंगभूमीवर नाट्य, सिनेमा, संगीत या क्षेत्रांत कोणते प्रयोग चालले होते, याचा लेखाजोखा खूप बारकाईने आणि रसाळपणे या पुस्तकात मांडला गेला आहे. लेखिकेची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, आकलनशक्ती, त्यावर स्वत:चे भाष्य आणि लिहिण्याची शैली यांमुळे हे पुस्तक सगळ्या पिढ्यांमधील कलाकारांसाठी अभ्यासाचा विषय ठरावा.

पूर्ण पुस्तकाचे चार भागांत वर्गीकरण करता येईल. पहिल्या भागात लेखिकेच्या पहिल्या गुरू पं. रोहिणी भाटे यांच्याकडे घेतलेले शिक्षण, त्यांचे नृत्यसंस्कार आणि एकूणच त्यांचा लेखिकेच्या जीवनावर झालेला परिणाम याचे वर्णन येते. दुसऱ्या भागात त्यांचे दुसरे गुरू पं. सुरेश तळवलकर यांचे संगीताचे संस्कार, लयतालाचे संस्कार आदी बाबी आहेत. पं. तळवलकर गुरुजींकडे शिकण्याचा अनुभव, नवीन




पती-पत्नीचं नातं महत्त्वपूर्ण आणि
अत्यंत संवेदनशील. या नात्यातील
आशा-निराशा, आनंद-उदासीनता
या मानसिक आंदोलनांना टिपणारी कादंबरी.

।। नातिचरामि ।।

मेघना पेठे

आवृत्ती आठवी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

वाट चोखाळत असताना होणारी मनाची ओढाताण, त्यातून हळूहळू दिसणारी वाट, गुरुजनांनी दिलेली मान्यता हा प्रवास खिळवून ठेवतो. तिसऱ्या भागात परदेशात पाश्चिमात्य नृत्य (बॅले) बघण्याची मिळालेली संधी, त्याचा त्यांच्या मनावर झालेला परिणाम आदीबाबत कळते. शमा भाटे यांनी स्वत: त्रिलोक गुर्टू यांच्या चमूसह केलेले अनेक परदेशदौरे, त्यामुळे झालेली पाश्चात्त्य संगीत आणि नृत्याची ओळख यांबद्दल त्यांनी खूप प्रामाणिकपणे आणि सविस्तर लिहिले आहे. पुस्तकाच्या चौथ्या भागात या परिणामाने त्यांच्या वेगवेगळ्या रचना कशा घडल्या, दृष्टी कशी घडली याचे विवेचन आहे. या क्षेत्रातील नवोदितांना हे सारे अनुभव मार्गदर्शक ठरतील. गुरूंचा आशीर्वाद किती महत्त्वाचा, हे पुस्तक वाचताना जाणवते.

कलाकार कितीही वयस्कर झाला तरी निवृत्त होत नाही, असे एकूण चित्र दिसते. पण शमा भाटे यांनी आपल्या संस्थेची मदार पुढच्या पिढीवर सोपवली आहे. ती पिढी शमा भाटे यांच्या अपेक्षेनुसार हा वारसा सांभाळते आहे व त्याबद्दल त्या समाधानी आहेत, हे पुस्तकावरून जाणवते. पुस्तकात जागोजागी त्यांनी त्यांच्या आयुष्यात बदल घडवणाऱ्या, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तींप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे. आयुष्यात झालेल्या चुकांविषयीदेखील लिहिले आहे. त्यामुळेच लिखाणातला सच्चेपणा काळजाचा ठाव घेतो. कलाकार म्हणून जगलेले समृद्ध जीवनाचे समर्थ चित्रण आणि रसाळ भाषा यांमुळेच हे पुस्तक वाचनीय आणि पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरेल. कोणत्याही कलाकाराला हे पुस्तक नवीन उर्मी देईल. कलाकारांचे आयुष्य माहीत नसणाऱ्या वाचकांना त्यांच्या श्रद्धा, त्यांचे कष्ट यांची ओळख होईल. फक्त नर्तकांना नव्हे, तर सगळ्या कलाकारांना शिकण्यासारखे या पुस्तकात बरेच काही आहे. सामान्य माणसांनीही आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे.

***रंजना फडके***

(*महाराष्ट्र टाइम्स*, संवाद पुरवणी, दिनांक २ नोव्हेंबर २०२५मधून साभार)

पिढ्यान्‌पिढ्यांचा 'भावरता'चा वारसा
जपणारे स्फटिकासारखे स्वच्छ,
पाण्यासारखे प्रवाही,
निसर्गासारखे निर्मळ आत्मकथन.

नाही मी एकला

फादर फ्रान्सिस दिब्रिटो

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३३०/- । (ट.ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ विविधा




ज्या काळी ‘इकॉलॉजी’ हा शब्दही रूढ व्हायचा होता, तेव्हापासून निसर्गरक्षणाच्या कामात गुंतलेला हा शास्त्रज्ञ. अमेरिकेत प्रगत शिक्षण घेऊनही तिथे न राहता मायभूमीला परतणाऱ्या विज्ञाननिष्ठ आणि तरीही कविमनाच्या शास्त्रज्ञाचे आवर्जून वाचावे, असे चरित्र.

### विज्ञानयात्री : माधव गाडगीळ

अ. पां. देशपांडे

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ १२५/- । (ट.ख. ₹ ५०)

मराठी साहित्यातील महत्त्वाचे कादंबरीकार आणि साक्षेपी समीक्षक असलेल्या सरदेशमुखांच्या साहित्याची एक नवी ओळख

### त्र्यं. वि. सरदेशमुख : आत्मनिष्ठ लेखकाची बखर

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)





भविष्यात पाण्याचा तुटवडा वाढतच जाणार. युद्धे होतील ती पाण्यासाठी. प्रत्येक सजीवाच्या अस्तित्वाचा, प्रत्येक जनसमूहाच्या आयुष्यक्रमाचा अन् प्रत्येक संस्कृतीच्या वाटचालीचा आधार म्हणजे पाणी.

### याला ‘जीवन’ ऐसे नाव!
पाण्याची साद्यंत कहाणी

मोहन आपटे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २२५/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी पार

## काय घडलं ‘राजहंसी’ नगरीत?

### भूमिका : अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून नाटकाचे दिग्दर्शक चंद्रकात कुलकर्णी, लेखक क्षितिज पटवर्धन,
मुंबई शाखेचे शाखाधिकारी विनायक पणशीकर



वाचन प्रेरणा दिन : पुण्यातील सेवासदन सराव पाठशाळेत
Palavi Nurturing Minds and Beyond या संस्थेतर्फे व शोभा श्रीकांत यांच्या हस्ते
विद्यार्थ्यांना ‘राजहंसी’ बालसाहित्य भेट

## ‘राजहंसी’ विविधा




लोन फ्रॉड, एटीएम क्लोन, ऑनलाइन गेमिंग,
घसघशीत उत्पन्नाची लालूच दाखवणारे प्रीपेड टास्क,
फिशिंग... एक ना दोन, अनेक प्रकारच्या
फसवणुकी. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोहक
मुखवट्याआडचा भेसूर चेहरा दाखवणारे-
सायबर गुन्ह्यांबाबत सतर्क बनवणारे -

### सायबर अॅटॅक

डॉ. संजय तुंगार । सुधीर साबळे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

पाकिस्तानचा इतिहास, संस्कृती, राज्यव्यवस्था,
राजकारण, अर्थव्यवस्था, सामाजिक बांधणी
आदींचा घेतलेला वेध;
तसंच स्वतंत्र, सार्वभौम आणि एकसंघ राष्ट्र म्हणून
पाकिस्तानचं भवितव्य काय असेल
याविषयी केलेलं साक्षेपी विवेचन.

### पाकिस्तान का मतलब क्या?

श्रीधर लोणी

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)






मुंबईतल्या कापड गिरण्यांचे मालक,
राजकारणी, बिल्डर या जाळ्यात भरडलेल्या
मजूरजगाचं चित्रण करणारी कादंबरी

### लस्ट फॉर लालबाग

विश्वास पाटील

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)

# वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## लस्ट फॉर लालबाग

'लस्ट फॉर लालबाग' वाचून पूर्ण केले. या पुस्तकाने मला वेड लावले. ना वेळेचे भान, ना झोप, ना जेवण. फक्त हे पुस्तक वाचतच बसावे. एकदा वाचन सुरू केले की, शंभर पाने वाचूनच नाइलाज म्हणून थांबत असे. सातच दिवसांत ८०४ पानांचे कालखंड वर्णन वाचले. 'अण्णा भाऊंची दर्दभरी दास्तान...' वाचताना संपूर्ण घटनाक्रम समजला.

माझे चिराबाजार, गिरगांवला ऑफिस आणि लालबाग, मलबार हिल, परेल वरळी, भुईवाडा पोलीस स्टेशनला माझा मित्र कै. प्रकाश परांजपे PI होता. पुढे ACP म्हणून सेवानिवृत्त झाला. त्यामुळे १९८०पासून मुंबई माहीत आहे. ग्राहक व विक्रेते असलेल्या भागामुळे मला तो परिसर माहीत आहे. चाळसंस्कृती माहीत आहे. चाळीतील मर्यादा ठाऊक आहेत. जशी इंदाची आई आवशी म्हणते तशी, 'हे बघ इंदा, तुझा हनुमान करायला आम्ही काय श्रीमंत राजे नाही. कामगार वस्तीत नळावर अंघोळ जशी आवरतो, अगदी तसाच शरीरधर्म उरकून मोकळे व्हायचे.' तर डॉ. दत्ता सामंत, दडपलेला वाताहत झालेला १९८२चा संप व आजची आमची मुंबई, तात्या रेडेकरसारखे तत्त्वनिष्ठ तसेच जाल्या, झेडाभाईसारखे खतरनाक गुंड, निर्दयी पोलीस यंत्रणा, रजनी पटेलसारखी मतलबी गिरणी मालकीण तसेच बांधकाम क्षेत्रात शासनकर्त्यांचा शिरकाव सर्व काही. निष्ठुर बाप तात्या रेडेकर म्हणतो, 'आता मी मेलो तरी पुढच्या जन्मात इंदा, तूच मुलगा म्हणून ये. तुझे अजून खूप लाड या आयुष्यात करता आले नाहीत.' गिरणी कामगार संप पाहण्यात, ऐकण्यात होता.

हे पुस्तक वाचकास जखडून ठेवणारे आहे. मी आपल्या सर्व पुस्तकांचा वाचक म्हणून मला वाटले ते माझ्या कुवतीप्रमाणे लिहीत आहे.

***वसंत रामचंद्र सुतार***

कधी न गळणारा

## 'राजहंसी' मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा
**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**
**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा
**'राजहंस ॲप'**

App Store — आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play — अँड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही 'राजहंस'ला असेही भेटू शकता
Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com I Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अनुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

# इंद्रधनुषी साहित्य योजना

## डिसेंबर २०२५ महिन्यातील सप्ततारांकित लेखकांची साहित्यसंपदा

**गिरीश कुबेर**



मेड इन चायना । टाटायन । पुतिन
युद्ध जिवांचे । एका तेलियाने । हा तेल नावाचा इतिहास आहे
अधर्मयुद्ध । तेल नावाचं वर्तमान

**डॉ. जयंत नारळीकर**



ताऱ्यांची जीवनगाथा । मायाजाल
गणित आणि विज्ञान : युगायुगांची जुगलबंदी

**फादर दिब्रिटो**



ओॲसिसच्या शोधात । पोप दुसरे जॉन पॉल : जीवनगाथा
सृजनाचा मळा । सुबोध बायबल (नवा व जुना करार)
नाही मी एकला । अनाहत ख्रिस्त

**अरुण खोपकर**



प्राक् सिनेमा । चित्रव्यूह
चलत्-चित्रव्यूह । गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका

**डॉ. नरेन्द्र दाभोलकर**



भ्रम आणि निरास । विचार तर कराल? । श्रद्धा अंधश्रद्धा
अंधश्रद्धा विनाशाय । अंधश्रद्धा : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम
प्रश्न मनाचे । मती-भानामती

**विजय तेंडुलकर**



रामप्रहर । तें दिवस
मसाज । तेंडुलकरांच्या निवडक कथा

**मोहन आपटे**




मला उत्तर हवंय! : पदार्थविज्ञान । संख्यांचे गहिरे रंग
इंटरनेट : एक कल्पवृक्ष । सूर्यमालेतील सृष्टिचमत्कार
नभ आक्रमिले । मला उत्तर हवंय! : सापेक्षता / पृथ्वीविज्ञान
याला 'जीवन' ऐसे नाव! । प्राचीन भारतीय गणित (भाग-२)
गणकचक्रचूडामणि भास्कर (संस्कृत / इंग्रजी)
भविष्यवेध - संगणक / इंटरनेट / यंत्रमानव
भविष्यवेध - तंत्रज्ञान / अवकाश / युद्धशास्त्र
भविष्यवेध - शरीरविज्ञान । ब्रह्मांड

Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 12th of every month and posted on 15th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post


# इंद्रधनुषी साहित्य योजनेची खास वैशिष्ट्ये

- ऑगस्ट २०२५ - डिसेंबर २०२५ या ५ महिन्यांत दरमहा ७ वेगवेगळ्या लेखकांचे साहित्य **२५% सवलतीत.**
- इतर सर्व 'राजहंसी' लेखकांचे साहित्य **१५% सवलतीत.**
- ही योजना राजहंसच्या सर्व शाखा, वेबसाइट, ॲप आणि निवडक पुस्तकविक्रेत्यांकडे उपलब्ध.
- राजहंस वेबसाइटवरून खरेदी करणाऱ्या ग्राहकांना पुस्तके भारतात कुठेही राजहंस प्रकाशनाच्या खर्चाने, रजिस्टर पोस्टाद्वारे पाठवली जातील.

**अधिक माहितीसाठी**

**स्कॅन करा**

**८३७८८३६८३६**

**राजहंस वेबसाइटला भेट द्या**
**www.rajhansprakashan.com**

किमान रु. २०००/-च्या खरेदीवर कविवर्य **मंगेश पाडगावकरांच्या 'कथारूप महाभारत'** या द्विखंडात्मक ग्रंथाची एक प्रत **'राजहंस'तर्फे सप्रेम भेट.**
(या भेटीचा लाभ घेण्यासाठी खरेदीच्या पावतीचे छायाचित्र व्हॉट्सॲपद्वारा **८३७८८३६८३६** या मोबाईल क्रमांकावर पाठवावे.)


प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**